रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३५५ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

मान्सूनची वेगवान मुसंडी

पुणे : नैऋत्य मान्सून दोन दिवस आधीच गुरुवारी (दि.३० मे) केरळमध्ये दाखल झाला. दरम्यान, मान्सूनचा वेग अधिक असून, तो वेगाने पुढे सरकत आहे. शनिवारी (दि.३१ मे) मान्सून आणखीन थोडा पुढे सरकला असून, सध्या मान्सूनने बंगालचा उर्वरित भाग आणि ईशान्य भारताचा आणखी काही भाग व्यापला आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे की, नैऋत्य मान्सून ईशान्य बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये आणि वायव्य बंगालच्या उपसागराच्या काही भागात, त्रिपुरा, मेघालय आणि आसामचा उर्वरित भाग आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या बहुतांश भागात पुढे सरकला आहे.

कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १जून २०२४

किंमत ४ ₹

MUMBAI COLLEGE OF HOTEL MANAGEMENT AND CATERING TECHNOLOGY ALIBAG
ADMISSION OPEN FOR 2024-25
COURSES OFFERED
•B.SC IN HOTEL MANAGEMENT
•DIP. IN HOTEL MANAGEMENT
•C.C IN FOOD AND BEVERAGE
•C.C IN HOTEL MANAGEMENT
•C.C IN COOKERY
contact : 9623648916
Address: 1st Floor, DeepMahal, Swami samartha Nagar, Pimpalbhat, Alibag 402201
mumbaicollegealibaug@gmail.com

महामार्गांवर ‘ब्लॅक स्पॉट’

जिल्ह्यातील ४२ ठिकाणे अपघात प्रवण क्षेत्र

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

रायगड जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे सर्वत्र पसरले आहे. त्यामुळे वाहनांची संख्यादेखील प्रचंड वाढली आहे. मात्र, बेशिस्त वाहन चालविल्याने अपघात होण्याच्या घटना वाढत आहेत. जिल्ह्यातील महामार्गांना ४२ ब्लॅक स्पॉटचा विळखा पसरला आहे. त्यामुळे वाहन चालविताना अपघातप्रवण क्षेत्राकडे लक्ष द्या, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेकडून केले जात आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत असताना, जिल्ह्यात औद्योगिकीकरणदेखील झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरिकीकरणदेखील वाढू लागले आहे. जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांसह कोकणातील पर्यटनस्थळी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शनिवार व रविवारी तसेच अन्य सुट्टीच्या दिवशी महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. काही वाहनचालक निश्चित स्थळी लवकर पोहोचण्याच्या नादात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करीत वाहन चालवितात. त्यामुळे अपघात होण्याची भीती अधिक आहे. तरीदेखील वाहने वेगामध्ये चालविली जात आहेत.

मुंबई-गोवा महामार्गासह मुंबई-पुणे द्रुतगती, राष्ट्रीय महामार्गावरील काही वळणाच्या ठिकाणी बेदरकारपणे वाहने चालविल्याने अपघात होऊन काहींना जीव गमवावा लागतो. तर काहींना जखमी होऊन कायमचे अपंगत्व येते. जिल्ह्यातील अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेमार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई केली जाते.

•> पान २ वर

> जिल्ह्यातील अपघात रोखण्यासाठी ब्लॅक स्पॉटची माहिती चालकांना दिली जात आहे. अपघात होऊ नये यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी फलक लावून वाहनांचा वेग कमी करण्याबरोबरच नियमांचे पालन करण्याच्या सूचना केल्या जात आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात वाहतूक पोलिसांद्वारे कारवाई केली जात आहे. नागरिकांनी महामार्गावरून प्रवास करताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा वाहतूक पोलिसांकडून करण्यात येत आहे.
>
> – अनिल लाड, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड



400 सीसीटीव्हींची नजर

जिल्ह्यात एकूण ४१ ब्लॅक स्पॉट आहेत. या अपघातप्रवण क्षेत्रातील अपघात रोखण्यासाठी वाहनचालकांना वाहन सुरक्षित चालविण्याचे संदेश दिले जात आहेत. कळंबोलीपासून रायगडच्या सीमारेषेपर्यंत ४०० हून अधिक ठिकाणी महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांतून वाहनचालकांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम वाहतूक पोलीस करीत आहेत.

काय आहे ‘ब्लॅक स्पॉट’?

ज्या ठिकाणी रस्त्यावर वारंवार अपघात होतात, त्या ठराविक ठिकाणांना ‘ब्लॅक स्पॉट’ म्हणतात. जर कोणत्याही रस्त्यावर, महामार्गावर, द्रुतगती मार्गांवर तीन वर्षांत एकाच ठिकाणी पाच अपघात झाले, याशिवाय कोणत्याही ठिकाणी तीन वर्षांत दहा मृत्यू झाल्यास ते ठिकाण शासनाकडून ‘ब्लॅक स्पॉट’ म्हणून घोषित होते.

कुठे–किती ब्लॅक स्पॉट?

मुंबई–गोवा महामार्ग **33**

मुंबई–पुणे एन.एच. ४ **04**

द्रुतगती मार्ग **05**

मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

आज मतदानाचा शेवटचा टप्पा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यासाठी १ जूनला मतदान होणार आहे. १ जूनला मतदान झाल्यानंतर ४ जूनला निकाल लागेल. त्यामुळे सगळ्याचं पक्षांची धाकधूक आता वाढली आहे. देशातील ७ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील मिळून ५७ जागांसाठी मतदान होईल. या मतदानात ९०४ उमेदवारांचा फैसला होणार आहे. या जागांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणूक लढवत असलेल्या वाराणसीचाही अखेरच्या •> पान २ वर

नेहुलीतील क्रीडा संकुलात होणार मतमोजणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदान सात मे रोजी पार पडले. मतदानानंतर वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्त्यांचे मतमोजणीकडे लक्ष लागून राहिले आहे. अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये मंगळवारी (दि.४) मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरु होणार आहे. या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.३१) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवडणूक उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. ६०.५१ टक्के इतके मतदान झाले. अलिबाग विधानसभा मतदारसंघात ६६.६७ टक्के, पेण ६६.६७ टक्के, श्रीवर्धन ५९.२० टक्के, महाड •> पान २ वर

मोबाईलला बंदी

निवडणुकीच्या मतमोजणीची फेरीनिहाय आकडेवारी मतमोजणी केंद्रातून ध्वनीक्षेपकाद्वारे वेळोवेळी घोषित केली जाणार आहे. या केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल, पेज कॅलक्युलेटर, इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तू सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

तरुणीला जिवंत गाडण्याचा प्रयत्न

पुणे : जमिनीच्या वादातून २२ वर्षांच्या तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पुण्याच्या राजगड तालुक्यातील कोंढवळे गावात शुक्रवारी (दि. ३१) ही अतिशय भयानक घटना घडल्याचे उघडकीस आले. ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या मदतीने तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न झाला. जमिनीचा बेकायदा ताबा घेण्यासाठी आलेल्या जमावाने हे कृत्य केलं. यावेळी जमावासोबत पोलीसही आल्याचा आरोप पीडित तरूणीने केला. यामुळे एकच खळबळ माजली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणी कोंढवळे गावातील असून, तिला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप तिने आणि तिच्या आईने केला. न्यायप्रविष्ट •> पान २ वर

मित्रानेच केला खून

। आंबेत । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती बबन मनवे यांचे वाहनचालक निलेश ढवळे हे २८ मे रोजी बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या पत्नीने म्हसळा पोलीस ठाण्यात दिली. मात्र, दोन दिवस उलटूनसुद्धा निलेश यांच्या बेपत्ता होण्यामागचे कारण स्पष्ट झाले नाही. अखेर पोलिसांनी निलेश यांच्यासोबत फिरणारे आणि त्यांचे मित्र अक्षय गोलंबरे यांचा तपास सुरू केला. या तपासात निलेश याला त्याच्याच मित्राने गोळी झाडून मारल्याच समोर आले.

दरम्यान, मृतदेहाला दगडाने बांधून एका डोहामध्ये ढकलून हे कृत्य लपवण्याचा प्रकार जेव्हा उघड झालं, तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. शुक्रवारी पहाटे २ ते ४ च्या दरम्यान वांगणी येथील एका जंगलात असणाऱ्या डोहात तपास करताना श्रीवर्धन आणि कोलाड येथील रेस्क्यू टीमला निलेशचे कपडे आणि जिवंत चार काडतुस सापडल्या. मात्र त्याची बॉडी मिळण्यास वेळ लागला त्यानंतर तब्बल चार ते पाच तासांनी पुन्हा शुक्रवारी रेस्क्यु ला शुरुवात झाली आणि अखेर शर्तीच्या प्रयत्नानंतर निलेश याची बॉडी काढण्यात आली,

तीन दिवसांनंतर लागला खुनाचा छडा

आरोपी अक्षय गोलांबरे | मयत निलेश ढवळे

निलेश हा त्याचा मित्र अक्षय गोलांबरे याच्यासोबत नेहमी शिकारीसाठी जात होता मात्र त्याच्याच हातून आपला शिकार होईल हे त्यालासुध्दा •> पान २ वर

रेवण्णाला पोलीस कोठडी

। बंगळुरू । वृत्तसंस्था ।

अत्याचार आणि लैंगिक छळ प्रकरणात हासन मतदारसंघाचा खासदार आणि माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा याला अटक करण्यात आली.

गुरूवारी मध्यरात्री विशेष तपास पथकाने (एसआयटी) त्याला जर्मनीतील म्युनिक येथून बंगळुरू विमानतळावर पोहोचताच अटक केली. अटकेनंतर त्याला शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

प्रज्वल रेवण्णा याच्यावर २७ एप्रिल रोजी लैंगिक छळाचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर तो परदेशात पळून गेला होता. अखेर शुक्रवारी त्याला अटक करण्यात आली. विशेष तपास पथकाने (एसआयटी) •> पान २ वर

‘...तर विधानसभेला सर्व जागा लढवू’

पुणे : मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास विधानसभा निवडणुकीत सगळ्याच्या सगळ्या २८८ जागा लढवू, अशी घोषणा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुण्यात केली. २०१३ मधील एका फसवणूक प्रकरणात जरांगे शुक्रवारी (दि. ३१) पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयात हजर झाले. त्या प्रकरणात न्यायालयानं जरांगेंना दिलासा दिला. त्यांच्या विरोधातलं अटक वॉरंट रद्द करण्यात आलं. यानंतर न्यायालय परिसरात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मी जातीवाद करत नाही. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पाडा इतकंच मी म्हणालो होतो. ४ जूनपासून मी पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसणार आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास येत्या विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करणार •> पान २ वर

शेकापक्षाचे माजी चिटणीस व उद्योजक
मा.श्री.वामनशेठ तांडेल यांना
६५ व्या वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
कितीही रागावले तरी समजून घेतले आम्हाला,
रुसलो कधी आम्ही तर जवळ घेतले आम्हाला,
रडवले कधी तर कधी हसवले,
केल्या पूर्ण सर्व आमच्या इच्छा,
पप्पा तुम्हाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!
* शुभेच्छुक *
सर्व तांडेल कुटुंबिय
मु.कोटनाका, ता.उरण. जि.रायगड

कृषीवल
७ जून
८८ वर्षे
विश्वासाची
बांधिलकीची
चळवळीची
संघर्षाची
-: सहप्रायोजक :-
SAMIRA HABITATS
hiranandani communities a niranjan hiranandani initiative
आरडीसीसी बँक सहप्रवास प्रगतीचा
HOTEL MAPLE IVY
Glitz EVENTS BY MANALI
PNP MARITIME
PNP INFRAPROJECTS
वर्धापन दिनानिमित्त
‘भव्य फॅशन शो’
मिस कृषीवल
मिसेस कृषीवल
सौंदर्य स्पर्धेचे आयोजन
स्थळ : क्षात्रैक्य समाज हॉल, कुरुळ, अलिबाग
वेळ : संध्याकाळी ५.३० वाजता
निमंत्रक :- कृषीवल परिवार

गावंड वाडीमध्ये भीषण पाणीटंचाई

महिलांना डवरे खोदून पाणी भरण्याची वेळ; पाझर तलावामध्ये भरपूर पाणी असूनही वणवण

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडस ग्रामपंचायतीमधील गावंड वाडीमध्ये पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. वाडीपासून एक किलोमीटर अंतरावर पाझर तलाव आहे. मात्र, तलावाची साफसफाई अनेक वर्षे करण्यात आली नसल्याने पाण्याचे झरे बंद झाले आहेत. त्यामुळे पाझर तलावाच्या खाली असलेल्या विहिरी कोरड्या झाल्या आहेत.दरम्यान, जलजीवन मिशनमधील नळपाणी योजनेचे काम दोन वर्षांपासून बंद आहे, त्यामुळे महिलांना डवरे खोदावे लागले आहेत.

गावंड वाडीमधील वस्ती ६० घरांची असून, या वाडीच्या खालील बाजूस एक किलोमीटर अंतरावर पाझर तलाव आहे. या पाझर तलावात मोठ्या प्रमाणावर पाणीसाठादेखील आहे. या पाझर तलावाच्या खालील बाजूस काही विहिरी असून, त्यातील पाणी गावंड वाडी ग्रामस्थ यांना पिण्यासाठी मिळत होते. तेथील एका विहिरीवर पंप लावून पाणी वाडीपर्यंत आणले आहे. मात्र, पाझर तलावाची साफसफाई जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाने केलेली नाही. त्यामुळे पावसाळ्यात दगड, माती येऊन तलाव गाळाने अर्धा भरला आहे.त्याचवेळी गाळ काढण्यात आला नसल्याने तेथे असलेले पाण्याचे झरे लोप पावले आहेत.त्यामुळे तलावातील पाणी अशुद्ध आणि हिरवेगार झाले आहे. त्याचवेळी पाझर तलावातील पाणी जमिनीमधून पाझरून जाण्याची प्रक्रिया गाळाने तलाव भरल्याने बंद झाली आहे. त्यामुळे तेथील विहिरी या कोरड्या पडल्या आहेत आणि त्यामुळे वाडीमध्ये असलेल्या टाकीमध्ये पाणी पोहोचत नाही.

त्यामुळे या वाडीमधील महिलांना तीव्र चढावाचा डोंगर उतरून पाणी आणण्यासाठी पाझर तलावाच्या खाली खोदलेल्या डवरे आहेत तेथे जावे लागत आहे. साधारण पाच ते सहा फूट खोल डवरा तेथे असून, एक महिला एकावेळी त्या डवऱ्यात उतरते आणि पाणी भरू शकते. अशा स्थितीत वाडीमधील महिलांचा संपूर्ण वेळ डवऱ्यातील पाणी भरण्यावर जात आहे. त्यामुळे महिलांना पाणी टंचाईने त्रस्त केले असून जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना गावंड वाडीसाठी मंजूर आहे. त्या योजनेसाठी वाडीमध्ये जलकुंभ बांधून वर्ष लोटले आहे. मात्र, अन्य कोणतीही कामे संबंधित योजेनेचे ठेकेदार यांनी पूर्ण केलेली नाहीत. त्यामुळे नळपाणी योजनादेखील कार्यान्वित होऊ शकली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी या ठिकाणी असलेल्या पाझर तलावाची दुरुस्तीदेखील शासनाने केली पाहिजे. तसेच नळपाणी योजना वेळेत पूर्ण करून गावंड वाडीमधील आदिवासी लोकांवर भरउन्हात पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ थांबेल.

> येथील पाझर तलाव हा केवळ एका वाडीमधील पाणीप्रश्न सोडविणार नाही. तर आसपासच्या सहा वाड्यांचा पाणीप्रश्न सुटू शकेल. दुसरीकडे या तलावाची शासनाने तात्काळ दुरुस्ती करावी जेणेकरून तलावाच्या खालील बाजूस असलेल्या विहिरीमध्ये जमिनीत पाझरून पाण्याचा साठा होऊ शकतो.
>
> – प्रकाश केवारी, ग्रामस्थ मोरेवाडी

> नळपाणी योजनेची विहीर बांधून एक वर्ष झाले, पण अन्य कोणतीही कामे झाली नाहीत. त्यात विहीर ज्या ठिकाणी खोदली जात आहे, तेथे बऱ्याच विहिरी आटल्या असल्याने पाणी नाही. त्यामुळे आधी पाझर तलाव स्वच्छ व गाळमुक्त करावा, अशी मागणी आहे.
>
> – सुरेश भगत, ग्रामस्थ

अशोक मोरेंचा सेवापूर्ती समारंभ

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुका सहाय्यक निबंधक अशोक मोरे हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्याने मुरुड तालुक्यातील पतसंस्थांतर्फे आयोजित सेवापूर्ती समारंभात तालुक्यातील विविध संस्थांच्यावतीने अशोक मोरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी राजिम बँकेचे मुरुड शाखा व्यवस्थापक गणेश पुगावकर, जय श्रीराम पतसंस्थेचे व्हा. चेअरमन प्रा. मेघराज जाधव, सरव्यवस्थापक संजय ठाकूर, प्रमोद वाघमारे, परस्पर पतसंस्थेचे चेअरमन विजय पैर, महात्मा फुले पतसंस्थेचे व्यवस्थापक राकेश मसाल, मर्चंट क्रेडिट सोसायटीचे व्यवस्थापक देवेंद्र मसाल, आदर्श पतसंस्थेच्या व्यवस्थापिका सुप्रिया काळबेरे, परस्पर पतसंस्थेचे चेअरमन विजय पैर, वाल्मिकी पतसंस्थेचे संचालक कृष्णा अंबाजी, निलेश बिरवाडकर, दीपक फलेभाई, श्रीकाळ भैरव पतसंस्थेचे संचालक निवास रसाळ, दीपक मयेकर, प्रशांत कासेकर, कोर्लई ग्रामीण पतसंस्थेचे व्यवस्थापक वेगस, प्रभात ग्रामीणचे गोविंद, आर. आर. परदेशी तसेच पतसंस्थेचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा
अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कुसुम जनार्दन पाटील, वाढदिवस, अलिबाग

प्रमोद भास्कर गुरव, वाढदिवस, अलिबाग

वासुदेव मल्लिकार्जुन बेत, अलिबाग

सौ. सुषमा सुहास थळे, अलिबाग

कै. विलास आत्माराम पाटील स्मरणार्थ अलिबाग

यंदाही पावसाच्या पाण्याची भीती

- **उरण रेल्वे स्थानक प्रशासन सतर्क**
- **पाणी काढण्यासाठी मोठाले पंप सज्ज**

। उरण । वार्ताहर ।

नवीमुंबईशहरालाजोडणाऱ्याउरणच्या रेल्वे स्टेशनमधील अंडरग्राऊंडमध्ये मागील वर्षी पावसाचे पाणी शिरल्याची घटना घडली होती. त्यामुळे रेल्वेच्या कामांची पोलखोल झाल्याने रेल्वे प्रशासनाची एकच धावपळ उडाली होती. मात्र, यावर्षीही उरण रेल्वे स्टेशन पाण्याखाली जाण्याची भीती असल्याने रेल्वे प्रशासन सतर्क झाल्याचे चित्र समोर येत आहे.

मुंबई शहराला जोडणारी उरण लोकल रेल्वे सेवा सुरू होण्याची वाट गेली ५० वर्षे उरणची जनता पाहात असताना, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या थाटामाटात मार्च २०२४ मध्ये उरण लोकल रेल्वे सेवेचा शुभारंभ केला. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे मागील वर्षीच्या पहिल्याच पावसात नव्याने उभारण्यात आलेल्या उरणच्या रेल्वे स्टेशनमधील अंडरग्राऊंडमध्ये चार ते पाच फुटांपर्यंत पावसाचे पाणी शिरल्याची बाब समोर आली होती. यावेळी उरणकरांच्या स्वप्नावररेल्वे प्रशासनाने पाणी शिंपडण्याचे चित्र समोर आले. मात्र, रेल्वेमंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत ठोस उपाययोजना न करता किंवा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न करता उरणची रेल्वे सेवा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मागील वर्षीची पुनरावृत्ती यावर्षीच्या पावसाळ्यात होणार अशी भीती रेल्वे प्रशासनाला वाटत असल्याने खबरदारी म्हणून उरण स्टेशनमध्ये साचणारे पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी चक्क पाच मोठाले पंप सज्ज करुन ठेवल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.

> उरण हा खाडी किनाऱ्यावर वसलेला तालुका आहे. उरण रेल्वे स्टेशनच्या अंडरग्राऊंडमध्ये मागील वर्षी पावसाचे पाणी साठवून राहिले होते. त्यामुळे यावर्षीही पावसाचे पाणी साठवून राहिले तर ते तात्काळ काढून टाकण्यासाठी खबरदारी म्हणून रेल्वे प्रशासनाच्या वतीने पाच वॉटर पंप आणून ठेवले आहेत.
>
> – गौतम कुमार, उरण स्टेशन मॅनेजर

आता भातकापणीची चिंता नाही

- **स्थानिक शेतकऱ्याने केली रिपर यंत्राची निर्मिती**
- **मजुरांच्या समस्येवर रामबाण उपाय**

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी म्हणून ओळखले जाणारे आणि भाताच्या उत्पादनात राज्यस्तरीय विक्रम करणारे शेतकऱ्याने आपल्या शेतातील भाताची कापणी रिपर यंत्राने केली आहे. या यंत्राची निर्मिती स्थानिक शेतकरी नैनेश दळवी आणि निलिकेश दळवी या बंधूंनी केली आहे. मजुरांची समस्या दूर करण्यात हे रिपर यंत्र यशस्वी ठरले असून, दिवसाला तीन ते चार एकर जमिनीमधील भाताची कापणी हे यंत्र करते.

तालुक्यातील वदप येथील प्रगतशील शेतकरी विनय वेखंडे यांनी आपल्या शेतातील भाताची कापणी ही रिपर यंत्राने केली. या यंत्राची निर्मती याच भागातील प्रगत शेतकरी दळवी बंधू यांनी केली आहे. कर्जतमधील राजनाला कालव्याच्या पाण्यावर दुबार शेतीचे मोठ्या प्रमाणात भाताचे सुपीक घेणारे शेतकरी म्हणून विनय वेखंडे यांची ओळख आहे. त्यांना भाताची कापणी करण्यासाठी मजुरांची समस्या भेडसावत होती. त्यामुळे त्यांनी रिपर कापणी यंत्राचा वापर करुन भाताची कापणी पूर्ण केली. या यंत्राचा वापर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कर्जत दिनेश कोळी यांनी केले आहे.

> रिपर हे कोणत्याही पावर टिलरला जोडता येते. या अवजारासाठी कृषी विभागामार्फत अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अल्प अत्यल्प व महिला शेतकऱ्यांसाठी ५० टक्के अनुदान देय आहे व इतर शेतकऱ्यांसाठी ४० टक्के अनुदान देय आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ऑनलाइन करून या योजनेचा लाभ घ्यावा. – दिनेश कोळी,
>
> मंडळ कृषी अधिकारी

एसटी बससेवा सुरु करावी

विद्यार्थ्यांसह प्रवाशांची मागणी

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील दुवा असलेली रोहा-काकळघर व अलिबाग -काकळघर ही एसटी सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी व प्रवासीवर्गातून जोर धरीत आहे.बोर्लीमांडला पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रोहा-साळाव-काकळघर व अलिबाग-साळाव-काकळघर या एसटी बसेस सुरू होत्या. परंतु, कोरोनाच्या काळात रस्ता नादुरुस्त हे कारण दाखवून या दोन्ही बसेस बंद करण्यात आल्या. त्यामुळे येथील जनतेची विशेषतः रेवदंडा व अलिबाग येथे येणारे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे रायगड विभाग नियंत्रक (रामवाडी-पेण) यांनी अलिबाग-काकळघर व रोहा-काकळघर ही एसटी सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनोहर मेहेतर यांनी केली आहे.

कर्जत शहरात नालेसफाईला प्रारंभ

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरात असलेल्या ३० किलोमीटर लांबीच्या नाल्याची सफाई पावसाळापूर्व कामांमध्ये केली जात आहे. पावसाळा तोंडावर आल्याने शहरातील उपनाल्यांची सफाई जवळपास पूर्ण झाली असून, मुख्य नाल्यांची सफाई पालिकेच्या आरोग्य विभागाकडून सुरु आहे. दरम्यान, जेसीबी मशीन आणि कंत्राटी कामगार यांच्या सहाय्याने नालेसफाई सुरु झाली आहे. बाजारपेठ भागातील गटारे मनुष्यबळ वापरून, तर शहरातील मोठ्या नाल्यांची जेसीबी मशीनच्या माध्यमातून सफाई सुरु आहे.

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातून उल्हास नदी वाहात असून, पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीच्या काळात शहरातील काही भागात पावसाचे पाणी शिरते. जुलै २०२१ मध्ये आलेल्या महापुरामध्ये उल्हास नदीचे पाणी नागरी वस्तीत घुसले होते, त्यात पूर येऊन दहीवली, इंदिरानगर बामचामळा, मुद्रे गुरुनगर तसेच कर्जत कोतवालनगर भागात पुराचे पाणी शिरुन काही कुटुंबांचे नुकसान झाले होते. त्यामुळे सन २०२२ च्या पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत. नगरपरिषद क्षेत्रात पावसाचे पाणी साठून काही हानी होऊ नये यासाठी नगरपरिषद क्षेत्रातील सर्व नाले आणि गटारांची पावसाळ्यापूर्वी जेसीबी व कामगारांव्दारे साफसफाईचे काम पालिकेने हाती घेतले असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे.

कर्जत शहरात ६ मुख्य नाले व २० इतर छोटे-मोठे नाले गटारे (अंदाजे लांबी ३० कि.मी.) असून, सदर गटारांचे पावसाळ्यापूर्वी साफसफाईचे काम हाती घेतले असून, आतापर्यंत नगर परिषदेचे जेसीबीद्वारे सुरु आहे.

पान १ वरुन

महामार्गांवर ‘ब्लॅक स्पॉट’

जिल्ह्यातील महामार्गावर धूम स्टाईलने वाहन चालविणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पाच स्पीड गन वाहने तैनात केली आहेत. वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगात वाहन चालविल्यास या स्पीड गन वाहनांद्वारे वाहनांचा वेग मोजला जात आहे. नियमाच्या पलीकडे वाहनाचा वेग दिसून आल्यावर त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे अपघातप्रवण क्षेत्रातून वाहन चालविताना काळजी घ्या, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून केले जात आहे.

मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

५७.५६ टक्के, दापोली ५७.३७ टक्के, गुहागर ५६.४४ टक्के मतदान झाले आहे. आता मतमोजणीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी तयारी अंतिम टप्प्यात आहे.

पेण, अलिबाग, दापोली विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी १४ टेबल लावण्यात येणार असून, मतमोजणीसाठी २७ फेऱ्या असणार आहेत. श्रीवर्धन व गुहागर मतदारसंघासाठी १४ टेबल असून, २३ फेऱ्या होणार आहेत. तसेच महाड विधानसभा मतदारसंघासाठी १४ टेबल लावण्यात येणार असून, २९ फेऱ्या होणार आहेत. सुरुवातीला टपाली मतपत्रिकांची स्वतंत्र मतमोजणी केली जाणार आहे. त्यासाठी दहा टेबल लावले जाणार आहेत. त्यानंतर ईव्हीएम मशीनमधील मतमोजणीला सुरुवात केली जाणार आहे.

मतमोजणीसाठी एक हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यामध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, तालिका कर्मचारी, शिपाई, हमाल आदींचा समावेश असेल, असेही त्यांनी सांगितले.

आज मतदानाचा शेवटचा टप्पा

समावेश आहे. अंतिम टप्प्यात एकूण ९०४ उमेदवारांचे भवितव्य ठरेल. टप्प्यात पंजाबमधील सर्व १३ जागांसाठी तसेच चंदिगढमधील एकमेव जागेसाठी मतदान होईल. त्या टप्प्यात उत्तर प्रदेशातील १३, पश्चिम बंगालमधील ९, बिहारमधील ८ आणि ओडिशातील ६ जागांसाठी मतदार त्यांचा कौल देतील. त्याशिवाय, हिमाचल प्रदेशातील सर्व ४ जागांसाठी आणि झारखंडमधील ३ जागांसाठीही मतदान होणार आहे. त्या मतदानामुळे मतदारांच्या कौलाची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर संपूर्ण देशाचे लक्ष ४ जूनला जाहीर होणाऱ्या निकालाकडे लागेल.निवडणूक आयोगाने १६ मार्चला लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले. त्यामुळे प्रचारासाठी ७५ दिवसांचा प्रदीर्घ कालावधी उपलब्ध झाला. साहजिकच, प्रमुख राजकीय पक्षांना मॅरेथॉन प्रचार मोहिमा राबवण्याची संधी मिळाली.

सर्वच पक्षांच्या स्टार प्रचारकांनी झंझावाती दौरे करत प्रचाराचा धुरळा उडवून दिला. यावेळच्या निवडणुकीला भाजपच्या नेतृत्वाखालील सत्तारूढ एनडीए विरूद्ध विरोधकांची इंडिया आघाडी अशा लढतीचे स्वरूप प्राप्त झाले.आतापर्यंत झालेल्या सर्व ६ टप्प्यातच ६२ टक्क्यांच्या वरच मतदान झालं. पहिल्या टप्प्यात ६६.१४% मतदान झालं, दुसऱ्या टप्प्यात ६६.७१ %, तिसऱ्या टप्प्यात ६५.६८ % मतदान झालं, चौथ्या टप्प्यात ६९.१६ %, पाचव्या टप्प्यात ६२.०२ %, तर सहाव्या टप्प्यात ६३.३७% मतदानाची नोंद झाली आहे.

तरुणीला जिवंत गाडण्याचा प्रयत्न

असलेल्या जमिनीचा बेकायदेशीररित्या ताबा घेण्यासाठी आलेल्या लोकांना त्या तरुणीने रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी जेसीबीच्या सहाय्याने तिच्या अंगावर माती टाकली आणि तिला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केला, असा आरोप करण्यात आला आहे. या धक्कादायक घटनेचा एक व्हिडीओदेखील समोर आला आहे. ते नागरिक पोलिसांसह जमिनीचा ताबा घेण्यासाठी आले असता, तरूणीचा त्यांच्याशी वाद झाला. त्यानंतर पोलिसांसमोरच ही घटना घडली. व्हायरल झालेल्या त्या व्हिडीओमध्ये ती तरूणी कंबरेपर्यंत मातीत गाडली गेल्याचेही दिसत आहे. अखेर तिच्या कुटुंबियांनी मदतीसाठी धाव घेत तिला बाहेर काढले. या प्रकरणानंतर तरुणीने वेल्हा पोलीस ठाण्यामध्ये रीतसर तक्रार केली आहे. त्यानंतर राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. या प्रकरणात आणखी १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

मित्रानेच केला खून

कळले नसेल. अक्षयने शिकारीसाठी वापरलेली बंदूक हीसुद्धा तपासात अवैध आणि विनापरवाना असल्याच समोर आले आहे. दुसरीकडं आचारसंहिता लागू असताना, सर्व शस्त्र प्रशासनाकडे जमा असताना या शस्त्रधारकांना अभय कोणी दिले, हादेखील मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.

‘...तर विधानसभेला सर्व जागा लढवू’

असल्याची मोठी घोषणा जरांगे पाटलांनी केली. पाटील यांनी विधानसभेला उमेदवार दिल्यास सत्ताधाऱ्यांना त्याचा फटका बसू शकतो. कायद्यापुढे सगळे समान आहेत. कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, असं जरांगे म्हणाले. सगळ्यांनी कायद्याचा सन्मान राखायला हवा. तारीख असल्यानं न्यायालयात आलो होतो. माझ्यावर काहीच आरोप नाहीत. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्यावर काही बोलणार नाही. विनाकारण आरोप करणाऱ्यांच्या आरोपात किती तथ्य असतं हे सगळ्यांना माहीत आहे. सरकारला माझ्याविरोधात काहीच सापडत नाही म्हणून ही केस ओपन झाली का, असा प्रश्न त्यांनी विचारला.

जरांगेंच्या शिवबा संघटनेनं २०१३ मध्ये एका नाटकाचं आयोजन केलं होतं. नाटकाच्या प्रयोगानंतर पैसे देण्यात आले नसल्याचा आरोप झाला होता. या प्रकरणात न्यायालयात खटला दाखल झाला. कोथरुड पोलीस ठाण्यात न्यायालयाच्या आदेशावरुन गुन्हा नोंदवण्यात आला होता. याच प्रकरणात पुणे न्यायालयानं त्यांच्याविरोधात वॉरंट काढलं होतं. त्यामुळे जरांगे न्यायालयात हजर राहिले. न्यायालयानं त्यांच्या विरोधातलं अटक वॉरंट रद्द करत ५०० रुपयांचा दंड ठोठावला.

रेवण्णालापोलीस कोठडी

सकाळी बंगळुरू येथील सीआयडी कार्यालयात त्याची प्राथमिक चौकशी केली. त्यानंतर बोअरिंग आणि लेडी कर्झन हॉस्पिटलमध्ये त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय तपासणीनंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रज्वल रेवण्णा याने आपल्या निरंकुश सत्तेचा वापर करून सुमारे ४०० महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले आहे. त्यात कर्नाटक प्रशासनातील महिला अधिकारी, नेत्यांच्या पत्नी आणि त्याच्याच पक्षातील महिला कार्यकर्त्यांचाही समावेश आहे. सुरुवातीपासूनच स्त्रीलंपट अशी प्रतिमा असलेल्या प्रज्वलने ४०० महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. पैकी ९० महिला या अधिकारी, नेत्यांच्या बायका किंवा निधर्मी जनता दलाच्या कार्यकर्त्या आहेत.

प्रज्वलने महिलांचे लैंगिक शोषण करत असताना स्वतःच त्या कृत्यांचे मोबाईलवर व्हिडीओ चित्रणही केले आहे. त्यावर कळस म्हणजे त्या व्हिडीओ चित्रणाची भीती दाखवून त्याने त्या महिलांना वारंवार आपल्या वासनेची शिकार बनवले आहे, असे तपासातून पुढे येत आहे.

उरणमध्ये खुलेआम गुटखा विक्री

। उरण । वार्ताहर ।

गुटखा, पान मसाला यासारख्या मानवी शरीरावर दुष्परिणाम करणाऱ्या अन्नपदार्थांच्या विक्रीवर महाराष्ट्रात बंदी घालण्यात आली. या गोष्टीला तब्बल ११ वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र, अजूनही कित्येक ठिकाणी छुप्या पद्धतीने गुटखा, पान मसाला विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. दरम्यान, उरण तालुक्यातील ग्रामीण भागात गुटखा, पान मसाला विक्री करणाऱ्या टपरीधारकांवर कारवाई होत नसल्याने ते खुलेआम विक्री करत असल्याची चर्चा आहे.

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या उरण तालुक्यात शहरी भाग असो किंवा ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री पाहायला मिळत आहे. कारवाईच्या भीतीने शहरी भागात गुटखा, पान मसाला छुप्या पद्धतीने विकला जात आहे. मात्र, उरणच्या ग्रामीण भागात पोलीस प्रशासन, अन्न नागरी औषध प्रशासन यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने खुलेआम त्याची विक्री होत आहे. यावर पालिका, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन व अन्न व औषध प्रशासन विभागाने कायमची बंदी घालावी, अशी मागणी उरण परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

दारुच्या सेवनाने करुण अंत

। बिरवाडी । वार्ताहर ।

बिरवाडी शहरामध्ये दिवसेंदिवस दारूच्या सेवनामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. मे महिन्यामध्ये एकामागे एक असे दोन मृत्यू दारूच्या अतिसेवनामुळे झालेले आढळून आले आहेत. १८ मे रोजी आशिष महाले (३८) रा. दासगव या तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच खरवली येथील पन्नास वर्षीय प्रकाश चव्हाण असे या इसमाचा मृत्यूसुद्धा दारूच्या अतिसेवनामुळे झाल्याची माहिती समजते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **श्री. मोहम्मद मुस्लिम जहीर हुसेन शेख**, यांस प्रकल्पग्रस्त शेतकरी म्हणून महाराष्ट्र शासन व सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड यांनी लागू केलेल्या पुर्नवसन आणि पुर्नस्थापना योजनेअंतर्गत सिडको संचिका/फाईल क्र. ULV-ICOGD-236 मधील भुखंड क्रमांक-१३१, सेक्टर-२५, क्षेत्रफळ ४० चौ.मी. मौजे पुष्पक (वहाळ), ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या मालकी हक्कातील संपादित करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार घर क्र. २३६ व संरचनेनुसार UL-252 ऐवजी अंतिम वाटप करण्यात आले असून सदर भूखंड वाटपपत्र दिनांक १२/०३/२०१८ रोजी वाटप करण्यात आलेला आहे. सदरचा भूखंड हा भूखंडमालक/धारक यांनी सिडकोची पूर्व परवानगी घेऊन हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. रमेश राम भुजारथ धोबी आणि श्रीमती पानमति रमेश धोबी** यांनी सदरचा भूखंड खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी सदर भूखंड आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करून घेण्यासंदर्भातील सिडकोमार्फत हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर त्या क्षेत्रासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे हस्तांतरण करण्यापूर्वी, सदर भूखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे. उपरोक्त भूखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तीला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उपलीज, भाडेकरार, उपभाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस पेंडन्स, कौटुंबिक व्यवस्थ/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, एनएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरुपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत. कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचारही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहू भूखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही : **अजित सिंह ॲण्ड असोसिएटस्**
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता : १७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-२७५७६१४२/४००२६१४२
E-Mail ID : ajeet_advocate@yahoo.co.in

निवडक

केशव म्हात्रे यांचे निधन

अलिबाग : कुरूळ येथील ज्येष्ठ ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते केशव गोविंद म्हात्रे यांचे राहत्या घरी गुरुवारी (दि.३०) वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी ते ९३ वर्षाचे होते. ते भजन रसिक होते. गावातील नवयुग भजन मंडळाच्या कार्यात ते सक्रिय होते. पखवाज वादक म्हणूनदेखील त्यांची ओळख होती. त्यामुळे समाजात ते लोकप्रिय होते. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कुरूळ ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक मंगेश म्हात्रे यांचे ते वडील होत.

मोफत पाण्याचे वाटप

कर्जत : सद्भाव फाउंडेशन मुंबई यांच्या सौजन्याने टंचाईग्रस्त वाड्यांना टँकरने मोफत पाणीवाटप करण्यात येत आहे. २० एप्रिल पासून वडाचीवाडी, जांभूळवाडी, पिंपळपाडा, चौधरवाडी, मिचकरवाडी, वरणे ठाकूरवाडी, चाफेवाडी, मेंगाळवाडी, टेपाचीवाडी, पाधीरवाडी, जांभळेवाडी या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. संस्थेचे कर्मचारी प्रवीण पाटील, प्रगती पाटील, संतोष ढाकवळ, प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांनी पाहणी करून वाड्यांना पिण्याचे पाणी सुरू केले आहे.

महेंद्र सुतक यांचे निधन

अलिबाग : सुतकवाडी येथील महेंद्र सुतक यांचे अपघाती निधन झाले. बुधवारी ते रामराज परिसरातील सत्यवाडी येथे शेणखताची माहिती घेण्यासाठी गेले होते. त्यानंतर ते सायंकाळी तेथून त्यांच्या दुचाकीवर येत असताना त्यांचे अपघाती निधन झाले. गुरुवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, रामा पिंगळा, सुनील पिंगळे, मनोहर सुर्वे, अनंत शेरमकर, नितीन पिंगळे, अमोल पाटील, कृष्णा सुतक आदी मित्रमंडळी उपस्थित होती.

सेमी इंग्रजीच्या नावाने लूट

पेण : बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९ नुसार इ. १ ली ते ८ वी पर्यंत सर्व शासकीय व अनुदानित शाळांमध्ये शासनाने सर्व मुलांना मोफत शिक्षणाची सुविधा केलेली असतानाही पेण तालुक्यातील अनेक अनुदानित शासकीय शाळा सेमी इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली राजरोसपणे पालकांकडून सुविधा निधीच्या नावाखाली ५ हजार पासून २० हजारापर्यंत फी घेऊन प्रवेश देत आहेत. अशा वारंवार तक्रारी पालकांकडून येत आहेत.

साईमंदिराचा वर्धापन दिन

माणगाव : आदर्श समतानगर येथील साई मंदिराचा आठवा वर्धापनदिन उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या साई मंदिराच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त सकाळी ५:३० वाजता काकड आरती, ७:१५ वाजता पंचारती, सकाळी ९ ते १२ या वेळेत होमहवन पूजा, दुपारी १२ ते ३ या वेळेत साई भंडारा, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत साईबाबा पालखी मिरवणूक साईमंदिर ते गजानन महाराज मंदिर अशी काढण्यात आली.पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत साई भक्तगणांची दर्शनासाठी गर्दी होती.

गाळातच साठवण तलावाची निर्मिती

ठेकेदाराने धुडकावल्या सूचना; अंभेरपाडा ग्रामस्थ आक्रमक

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात असलेल्या दुर्गम भागात उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या झळा तीव्र होतात. पाण्याचे स्त्रोत आटल्याने जलजीवन मिशन योजनादेखील बिनकामाची ठरली आहे. त्यामुळे शासनाकडून पाणी अडवा पाणी जिरवा हे धोरण अवलंबले जात आहे. तालुक्यातील अंभेरपाडा गावात यासाठी २ कोटी १९ लाख रुपये खर्चून साठवण तलाव बांधला जात आहे. मात्र हे बांधकाम होत असताना ग्रामस्थांनी केलेल्या सूचना ठेकेदाराकडून धुडकावल्या जात आहेत. तर तलावातील गाळ काढला गेला नसल्याने ग्रामस्थ नाराज झाले आहेत. तेव्हा हे काम गावासाठी कि ठेकेदारासाठी असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे

कर्जत तालुक्याला निसर्गाचं वरदान लाभलं आहे. निसर्गसंपन्न असलेल्या या तालुक्यात डोंगर दुर्गम भाग देखील आहे. तर या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधवांची वस्ती आहे. उन्हाळ्यात उन्हाच्या झळांसोबत या भागात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईच्या झळा देखील तीव्र होतात. त्यामुळे पाण्यासाठी महिलांना पायपीट करावी लागते. शासनाकडून पाणी टंचाई आराखडा तयार होत असला तरी प्रत्यक्षात तुटपुंज्या टँकरच्या भरवशावर पाणी टंचाईवर मात होत नाही हे वास्तव आहे. दुसरीकडे शासनाच्या जलजीवन मिशनमधून तालुका टँकरमुक्त होईल, अशा आशेवर असलेल्या नागरिकांच्या आशा अपेक्षांवर पाणी फेरलं गेलं आहे. कारण जलजीवन मिशन योजनांचे स्रोतच कोरडे ठाक पडले आहेत. दरम्यान शासनाने यासाठी पाणी अडवा पाणी जिरवा या जुन्या धोरणाचा पुन्हा अवलंब केला असल्याचे चित्र तालुक्यातील अंभेरपाड्यात पाहायला मिळत आहे.

तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या अंभेरपाड्यात वाहणाऱ्या ओढ्यावर पूर्वीचा छोटा बंधारा होता. त्यावर शासनाच्या माध्यमातून जलसंधारण मृद् व जलसंधारण विभागाकडून साठवण तलाव प्रस्तावित करण्यात आला. यासाठी २ कोटी १२ लाख ३८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. प्रत्यक्षात अधिकच्या ४.७० टक्के दराने भाग एकसाठी निविदा ठेकेदाराने भरली ती मंजूरही झाली. त्यामुळे प्रकल्पाची मूळ रक्कम ७ लाख १९ हजार रुपयांनी वाढली. सोलापूरच्या पृथ्वी लॅन्डमार्क्स अँड डेव्हलपर्स यांना ठेका देण्यात आला. १५ मार्च २०२४ रोजी या कामाचे कार्यारंभ आदेश ठेकेदाराला देण्यात आले. अर्धा उन्हाळा उलटल्यावर आदेश मिळाल्याने कामासही उशीर झाला. ठेकेदाराने काम सुरु केले मात्र आजुबाजूला शेतकऱ्यांच्या जमिनीदेखील या प्रकल्पात बाधित होत होत्या. परंतु, गावाला पाणी मिळेल याकरता सगळ्यांनी सहकार्य करण्याचे ठरवले. बंधारा उभा राहिला पिचिंगचे कामदेखील अर्धे झाले मात्र साठवण भागातील माती, गाळ काढण्याबाबत गावकऱ्यांनी ठेकेदाराला सुचित केले. इतरही काही त्रुटींबाबत ग्रामस्थांनी ठेकेदाराला सांगितले असताना ठेकेदार मात्र ऐकून घेण्यास तयार नाही असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या सूचना धुडकावून काम करत असल्याने यात पाणी साठा जास्त न होता अखेरीस ग्रामस्थांना याचा त्रास होणार असल्याने आता ग्रामस्थ याबाबत आक्रमक झाले आहेत. यामुळे मोठा संघर्ष होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

> या कामात खरंतर गाळ किंवा माती काढणं समाविष्ट नाही. मात्र हे काम पूर्ण झाल्यानंतर याबाबत आपण नक्कीच इतर कुठली तरतूद करून माती काढण्याचं काम करू. ग्रामस्थांशी उलट वागणं हे चुकीचं आहे. याबाबत ठेकेदाराला सूचना देण्याचं काम करू. ग्रामस्थांच्या सूचना ऐकून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करणार आहोत.
>
> - विलास देशमुख, उपअभियंता मृद् व जलसंधारण उपविभाग कर्जत

निवडणुकीचे ढिसाळ नियोजन

अमर वार्डे यांची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार

। रायगड । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या कालावधीतील रायगड जिल्हा प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा पाढा दत्ताजीराव खानविलकर शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे वाचला आहे. जिल्हा निवडणूक विभागाने केलेल्या नियोजनाचा कर्मचाऱ्यावर ठेवलेला धाक वार्डे यांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्राद्वारे अनुभव कथन केला आहे. शासकीय पातळीवर पाठविलेल्या कोणत्याही पत्राची दखल न घेण्याची प्रथा अस्तित्वात आहे. त्यामुळे पत्राला केराची टोपली दाखवली जाईल हि बाब वार्डे यांनी पत्रामध्ये अधोरेखित केली आहे.

मे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभानिवडणुकीवेळी दत्ताजीराव खानविलकर शैक्षणिक संस्थेच्या शाळेतील शिक्षक व शिक्षिका निवडणूक कामासाठी नेमले गेले होते. त्यांच्या अनुभवावर आधारित पत्रप्रपंच करून वार्डे यांनी निवडणूक विभागाच्या नियोजनावर आक्षेप घेतला आहे. रोहा - खुटल येथे निवडणुकीसाठी नेमणूक झालेल्या अधिकाऱ्यांची जेवणाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे स्वखर्चाने जेवण मागवावे लागले. निवडणुकीचे काम करण्यासाठी निवडण्यात आलेल्या स्त्री शिक्षिकेची नेमणूक तालुक्यातच करण्यात यावी. अनेक शिक्षकांना दुसऱ्या तालुक्यात नेमणूक मिळाली होती. श्रीवर्धन मतदारसंघात नियुक्ती करण्यात आलेल्या अनेक मतदान बूथवर स्वच्छतागृहात वापरण्यात येणारे पाणी पिण्यासाठी उपलब्ध करून दिले होते. अलिबाग मतदार संघातून जाताना वाहतूक व्यवस्था व्यवस्थित होती. परंतु, श्रीवर्धन आणि महाड मतदार संघातून परतीचा प्रवास अतिशय त्रासदायक झाला वाहतूक व्यवस्था योग्य प्रकारे उपलब्ध नव्हती. असे अमर वार्डे यांनी पत्रात नमूद केले आहे.

अलिबाग शहरात जे.एस.एम. कॉलेजच्या आवारात निवडणूक व्यवस्थेचे प्रमुख केंद्र होते. ऐन उन्हाळ्यात देखील तिथे किमान पंख्याचीही सोय नव्हती. राखीव कर्मचाऱ्यांना दुपार होईपर्यंत कोणतीही सुविधा दिली गेली नाही. इतकेच नव्हे तर तेथे उपस्थित महिलांनी अव्यवस्थेविरोधात आवाज उठविल्यावर त्यांना घरी जाण्यास सांगितले. निवडणुकीनंतर दोन आठवड्यांनी त्यांना निवडणूक कामाचा मोबदला दिला गेला. अनेक महिला कर्मचाऱ्यांनी सांगितल्यानुसार तहसिलदारांनी अनेक महिला कर्मचाऱ्यांशी उद्धटपणाने वर्तन केले. इतकेच नव्हे तर अपमानास्पद वागणूक दिली, असे वार्डे यांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

अलिबाग शहरात निवडणूक कामाच्या प्रशिक्षणासाठी मेघा चित्रमंदिर आणि आरसीएफच्या निवासी संकुलाच्या हॉलचा वापर केला गेला. या दोनही ठिकाणी घामाघूम होऊन प्रशिक्षणाचा जाच सहन करावा लागला. इतकेच नव्हे तर प्रश्न विचारणाऱ्यांना निवडणूक विषय कायद्याची धमकी देऊन गप्प बसविण्यात आले. आरसीएफचा हॉल वातानुकूलीत असतानाही त्या यंत्रणेचा वापर केला गेला नाही. दोन्ही ठिकाणी जेवणाची व्यवस्था अत्यंत असमाधानकारक होती. परिणामी बाहेर जाऊन जेवणाचा मार्ग पत्करला गेला. त्यासाठी स्वतःच्या खिशातूनच पैसे खर्च करावे लागले.

जिल्ह्यात बीजप्रक्रिया अभियान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पावसाळा सुरू झाल्यावर भात पेरणीची लगबग सुरू होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत बीज प्रक्रिया अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानाला गावागावातून प्रतिसाद मिळत आहे. पुरुष व महिला शेतकरी या अभियानात स्वयंस्फुर्तीने सहभागी होत असून बियाणे खरेदीपासून अनेक माहिती कृषी विभागाकडून दिली जात आहे.

जिल्ह्यामध्ये भाताचे क्षेत्र एक लाख हेक्टरहून अधिक आहे. पावसाच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात शेतकरी शेती करतात. पावसाळा सुरू होण्यासाठी बोटावर मोजण्याइतके दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची आता बियाणे खरेदीची लगबगदेखील वाढणार आहे. त्या निमित्ताने कृषी विभागाने जिल्ह्यात बीज प्रक्रिया अभियान सुरू केले आहे. २५ मे पासून हे अभियान सुरू झाले असून ६ जूनपर्यंत राहणार आहे. गावे, वाड्यांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून बीज प्रक्रियेचे महत्व पटवून देण्याचे काम कृषी सहाय्यकांकडून केले जात आहे.

चोरढे येथे योगशिबीर

रेवदंडा : गुरुकुल आरोग्य योगपीठ व श्री. स. स. काडसिद्धेश्वर सांप्र. गुरुभक्त मंडळ चोरढे यांच्या संयुक्त विद्यमाने चोरढे येथे हनुमान मंदिरात दोन दिवस विनामूल्य योग शिबीर घेण्यात आले. सदर शिबिरात योगाचे महत्व, उद्दिष्टे तसेच कराटे, लाठीकाठी याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. सदर शिबीर चंद्रकांत खोत, उत्तम मांदारे, तृप्ती घाग, अनिल चोरढेकर, प्रमिला चोरढेकर, सुनिल घाग यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आले.

माझी वसुंधरा अभियानात साजगांव उत्कृष्ट

। खोपोली । प्रतिनिधी।

माझी वसुंधरा अभियान ४ या अभियानातर्गत साजगांव ग्रुप ग्रामपंचायतीने ९०० झाडांचे वृक्षारोपण केले आहे. गांडूळ खत, शीड बॉल, जलशिवार अंतर्गत तलाव बांधणे, ग्रामपंचायत हद्दीतील दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिक वापरावर बंदी घातली आहे.

गतवर्षी माझी वसुंधरा अभियानात साजगांव ग्रुप ग्रामपंचायतीने कोकण विभागातून बक्षिस प्राप्त केले होते. पृथ्वी, वायू, जल, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर माझी वसुंधरा अभियान ४ राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २०२३ ते २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात ग्रामपंचायतीने नऊ एकरात विविध प्रकारची ९०० झाडे लावली आहेत. झाडांचे संवर्धन करण्यासाठी ठिबक सिंचनची व्यवस्था केली आहे. बाजूलाच जलयुक्त शिवार अंतर्गत मोठा बंधारा बांधण्यात येणार आहे. गांडूळ खताची निर्मिती केली आहे. घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था करीत सर्वत्र स्वच्छता ठेवली आहे. ग्रामपंचायत हद्दीतील दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप करीत प्लास्टिक वापरावर बंदी घातली आहे. गणेशोत्सवात पर्यावरण पूरक सजावट करणाऱ्या गणेशभक्तांना बक्षिसे वाटप, निर्माल्यापासून खताची निर्मिती केली आहे. शीड बॉलमधून डोंगरावर वृक्षारोपण करण्यात आले आहे.

माझी वसुंधरा ४ अभियानातर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ग्रामपंचायतीचे सदस्य, सर्व कर्मचारी यांनी मेहनत घेतली असून नागरिकांनी प्रतिसाद दिल्याबद्दल सरपंच विनोद खवळे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

विकास चित्ते सन्मानित

कर्जत : माऊंटन स्पोर्ट्स अकॅडमी, मुंबई महाराष्ट्र या गिर्यारोहण क्षेत्रातील अग्रगण्य व नामांकित संस्थेकडून शिवशंभो युवा हायकर्स कर्जत संस्थेचे अध्यक्ष, ज्येष्ठ गिर्यारोहक विकास चित्ते यांचा गिर्यारोहण क्षेत्रातील प्रदिर्घ कारकिर्दीबदल व कर्जत परिसरात गिर्यारोहण हा धाडसी प्रकार रुजवून अनेक गिर्यारोहक तयार केल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. मराठा सेवा संघ हॉल, मुलुंड येथील सभागृहात सोहळा पार पडला.

उरणमधील ग्रामपंचायतींचा कचरा प्रश्न ऐरणीवर

। उरण । वार्ताहर ।

देशात स्वच्छ भारत अभियानाचा बोलबाला सुरू असताना उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या ढिसाळ नियोजनामुळे कचरा प्रश्नाचे तीनतेरा वाजले आहेत. गावातून गोळा केलेला कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकला जात असल्याने रस्ते डम्पिंग पथ बनू लागले आहेत.

मुंबई नजिकच्या उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीतील कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकला जात आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या जनतेचा श्वास कोंडला जात आहे. प्रवाशांना नाक मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सध्या उरण तालुक्यातील चिरनेर-कोप्रोली, चिर्ले- दिघोडे, पिरवाडी-चारफाटा, द्रोणागिरी नोड, सारडे, पिरकोन वशेणी, पुनाडे, पानदिवे, खोपटा, तसेच तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीमधील नागरिक ओल्या सुक्या कचऱ्याचे नियोजन न करता हा कचरा रस्त्यावर टाकत आहेत. ओला कचरा मोठ्या प्रमाणात कुजत असून, या कचऱ्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरत आहे. या दुर्गंधीने साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

स्वच्छता अभियानाचे उरण तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील नागरिक तीनतेरा वाजवीत आहेत. विशेष म्हणजे ग्रामस्वच्छतेसाठी उरण तालुक्यातील महसूल विभाग, पंचायत समिती प्रशासनसुद्धा ग्रामपंचायतींच्या या अस्वच्छ कारभाराला प्रतिबंध करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे. उरण तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ओला कचरा, सुका कचरा वेगळा करावा, शिवाय असलेल्या ओल्या कचऱ्याचे कंपोस्टिंग करावे, अशी जनजागृती करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायतींना हक्काचे डम्पिंग ग्राउंड नाही. तालुक्यातील ग्रामीण भागात कचऱ्याचे विघटन करता येईल, अशी सेवादेखील नाही. परिणामी ग्रामीण भागातील नागरिक गावातील कचरा रस्त्याच्या कडेला टाकत आहेत. उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम आणि उरण पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी एस. पी. वाठारकर यांनी जनतेच्या आरोग्याशी निगडित असलेल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी जनतेतून करण्यात येत आहे. येत्या काळात पावसाळा सुरू होणार असून या कचऱ्याची समस्या पावसाळ्यात अधिक गंभीर होणार आहे.

> **उरण तालुक्यात डम्पिंग ग्राउंडविरहित कचरा व्यवस्थापनाकडे ग्रामपंचायतींची वाटचाल सुरु आहे. त्यामुळे कचऱ्याचे विघटन कसे करावे, ओला कचरा, सुका कचरा वेगळा करावा, ओल्या कचऱ्याचे कंपोस्ट करावे व सुक्या कचऱ्याचे टाकाऊपासून टिकाऊ वस्तू असे प्रयोग करून उरण तालुक्यातील कचऱ्याचे विघटन करावे अशा सूचना ग्रामपंचायतीना देण्यात येत आहेत.**
>
> **–एस. पी. वाठारकर**
> **गटविकास अधिकारी,उरण**

शेकापच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

। शिहू । वार्ताहर ।

चोळे, शिहू, झोतिरपाडा विभागातील शेतकरी, विद्यार्थी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन चोळे येथे शेकाप युवा नेते अतुल म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन जनआंदोलनाचे पनवेल तालुका अध्यक्ष अनिल ढवळे, पी. डी. पाटील, शेतकरी संघर्ष समिती जिल्हाध्यक्ष अनंत भूरे, शिवसेना शिहू विभाग प्रमुख दिपक पाटील, शेखर शेळके, अ.का.म्हात्रे, के.के. कुथे, जानू कुथे, नारायण पाटील, गजानन नाईक, हेमांगी बंगाल, दिनेश पाटील आदी ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. दहावी बारावीमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. शिहू, नवी मुंढानी, बेणसे, टाऊनशिप, बेणसेवाडी, बेणसे आदिवासी वाडी, गंगावणे येथील ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या यावेळी प्रत्येक घरात अतुल म्हात्रे यांचे औक्षण करून स्वागत केले. पेण तालुक्याच्या विकासासाठी अतुल म्हात्रे यांच्या नावाला शिहू झोतिरपाडा विभागातून नागरिकांनी पहिली पसंती दर्शवली आहे.

> **स्थानिकांना रोजगार, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त,जे. एस.डब्लू कंपनीकडून होणारे शेतीचे नुकसान, रिलायन्सचे केमिकलयुक्त पाणी जाऊन शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, आदिवासी बांधवांचे प्रश्न, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले असे विविध सामाजिक प्रश्न हातात घेवून ते सोडविणार**
>
> **–अतुल म्हात्रे**

भात झोडणीची कामे अंतिम टप्प्यात

खांब: उन्हाळी हंगामातील भात झोडणीची कामे अंतिम टप्प्यात आली असल्याचे चित्र आहे. रोहा तालुक्यातील डोलवहाळ येथील बंधाऱ्याच्या पाण्यातून कालव्याच्या सहाय्याने तालुक्यातील काही भागात उन्हाळी हंगामासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याच पाण्यावर आधारित भात लागवड केली जाते.

मागील आठ ते दहा दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने हजेरी लावून शेतीचे नुकसान केले. अशा परिस्थितीत झोडणी, मळणीची कामे जलदगतीने व्हावी यासाठी वाटेल तेवढी मजूरी देऊन प्रसंगी घरातील सर्वच माणसांच्या सहकार्याने शेतकरी वर्गाने आपापल्या शेतीतील कामे उरकून घेतली.

सद्यस्थितीत आहे ते पदरात पाडण्यासाठी शेतकरी वर्गाची एकच धावपळ सुरू झाली असून भात झोडणीची कामे अंतिम टप्प्यात आली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

माथेरानचा रानमेवा बाजारात;पर्यटक खुश

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान पर्यटनस्थळी असलेल्या जंगलात चैत्र महिन्यापासून रानमेवा मिळायला सुरुवात होते. जंगलातील जंगली झाडांना फुले आणि फळे येण्याचा हंगाम सुरु होतो. जंगलातील फळे ही माथेरानकरांसाठी औषधी ठेवा असतो. त्यामुळे माथेरानमधील तरुण आणि स्थानिक आदिवासी हे या फळांचा आस्वाद घेण्यासाठी जंगलात फिरताना दिसत आहेत.

समुद्रसपाटीपासून ८०३.९८ मीटर उंचीवर असणारे सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीतील निसर्गाचे देणे लाभलेले लाभलेले निसर्गरम्य माथेरान आणखी खुलून गेले आहे. माथेरानला येणारा पर्यटक आपल्या नजरेत साठवून घेऊन जात असतो. माथेरानच्या डोंगरदऱ्या आणि घनदाट जंगल हे माथेरानचे आकर्षण आहे. सध्या येथे उन्हाळी हंगाम सुरू झाला आहे. मात्र चैत्र महिन्याची सुरुवात झाली आणि अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्या दिवशी झालेल्या अवकाळी पावसाने माथेरानमधील झाडांवर बसलेला लाल मातीचा थर हा जमिनीवर खाली कोसळला आहे. अवकाळी पावसामुळे यावर्षी काही प्रमाणात अधिक जंगली मेवा बहरात आला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जंगल भाग असलेल्या माथेरानच्या निसर्गाला बहर आल्याचे दिसून येत आहे.

माथेरानमधील जंगलात आढळणारी जंगली झाडे यांना लागणारी फुले, फळे ही वेगळी अनुभूती देत असतात. जंगलात अटक आठुरणे, फणशी, आसाना, तोरणे, जांभूळ, करवंदे आदी जंगली फळे यांचा हंगाम सुरू झाला आहे. कमी प्रमाणात असला तरी यापैकी अनेक झाडांना लागलेली फुले ही फळामध्ये रुपांतरीत झालेली दिसून येत आहेत.

त्यामुळे माथेरामधील हौशी तरुण आणि स्थानिक आदिवासी हे जंगल भागात फिरून फळांचा शोध घेवू लागले आहेत. त्या फळांमधील अटक, आसाणा हा जंगली मेवा माथेरान आणि महाबळेश्वर शिवाय अन्य कुठेही जंगलात मिळत नाही. त्यामुळे पर्यटकदेखील या फळांची खरेदी करण्याचा आवडीने प्रयत्न करीत असतो. त्यात हा जंगली मेवा मिळण्याची ठिकाणे माथेरान शहरात जागोजागी दिसून येत आहेत. गार्डन, कारंजा, स्टेशन परिसर शिवाय नरोगेज मार्गावर आणि विशेष संख्येने जंगली मेवा विकणारे हे प्रामुख्याने अमन लॉज स्थानकात पर्यटकांच्या सेवेत असतात.

मोदींचे गांधीप्रेम

भारताचे पंतप्रधान खोटारडे आहेत ही जुनी बातमी झाली. ते आज काय खोटे बोलले ही नवी बातमी असते. गेल्या दहा वर्षात त्यांनी याबाबतीत चांगलेच नाव कमावले आहे. यंदाच्या निवडणुकीत तर त्यांनी बहुदा दर दिवशी एक नवे खोटे बोलण्याचा संकल्प केला होता. महात्मा गांधी यांच्यावरचा इंग्रजी सिनेमा येईपर्यंत ते जगाला ठाऊक नव्हते असे पंतप्रधान म्हणाले. एका टीव्ही वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हा दावा केला. गेल्या ७५ वर्षात काँग्रेस सरकारने गांधीजींची कामगिरी व नाव जगात पोचवण्यासाठी काहीच केले नाही असा नरेंद्र मोदी यांचा दावा आहे. मार्टिन ल्यूथर किंग आणि नेल्सन मंडेला यांच्या तुलनेत गांधीजींबाबत जगाला काहीच माहिती नव्हती असे ते म्हणाले. मोदींची ही सर्व विधाने खोटी आणि हास्यास्पद तर आहेतच, पण अत्यंत मानभावी आणि मतलबी देखील आहेत. सत्याग्रहाचे शस्त्र आणि ब्रिटिशांविरुध्दचा त्यांचा अहिंसक लढा यामुळे गांधीजींची १९२० सालापासूनच सर्व जगात चर्चा चालू होती. त्यांच्या मिठाच्या सत्याग्रहाचे आंदोलन जगभर गाजले. त्याच्या बातम्या द्यायला अमेरिका व युरोपातील अनेक पत्रकार आले होते. त्यांनी याबाबत पुस्तकेही लिहिली आहेत. राईज एंड फॉल ऑफ थर्ड राईश हे पुस्तक लिहिणारा विल्यम शिरर (ज्याच्या पुस्तकाच्या आधारे मराठीत नाझी भस्मासुराचा उदयास्त लिहिले गेले) हा त्यातलाच एक. पुढे याच शिररने हिटलरची राजवटही जवळून पाहिली आणि तो निव्वळ पत्रकार उरला नाही. गांधीजींचा मार्गच जगाला तारू शकेल या निष्कर्षाला तो आला आणि त्याचा प्रचारही करू लागला. असा माणूस या जगाच्या पाठीवर होऊन गेला यावर विश्वास बसणे कठीण होईल अशा शब्दात अल्बर्ट आईनस्टाईनने गांधीजीचा खून झाल्यावर त्यांना श्रध्दांजली वाहिली होती. गांधीजी त्यांच्या हयातीतच जगाच्या सर्व कानाकोपऱ्यात व सर्व स्तरांमध्ये पोचले होते याचे हे केवळ दोन पुरावे आहेत.

राजघाटाचे दर्शन

जगात बहुतांश देशांमध्ये गांधीजींचे पुतळे आहेत. परदेशातील राष्ट्रप्रमुख भारतात आले की ते हमखास दिल्लीतील राजघाटावर जाऊन श्रध्दांजली अर्पण करतात. अमेरिकेत इतर देशांचे नेते लिंकन मेमोरियलला जातात. तोच मान गांधीजींना मिळतो. यावरूनच त्यांच्याविषयी जगातील लोकांचा श्रध्दाभाव किती खोल आहे हे लक्षात येते. मोदी यांनी ज्या मार्टिन ल्यूथर किंग व नेल्सन मंडेला केला त्या दोहोंनीही गांधीजींना आपले गुरु मानले होते. मार्टिन ल्यूथरने १९६० च्या दशकात काळ्यांविरुध्दच्या अन्यायाविरुध्द आवाज उठवला. मंडेला यांनी २७ वर्षे आफ्रिकेच्या तुरुंगात काढली. १९९० च्या दशकात त्यांची सुटका झाली व त्यानंतर आफ्रिकेतील काळा-गोरा भेद संपला. आज आफ्रिका ही पॅलेस्टिनी लढ्याला पाठिंबा देते व इस्रायलवर आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला दाखल करते. त्यामागे गांधीजींचीही प्रेरणा आहे हे लक्षात घ्यायला हवे. भारताचे मोदी मात्र इस्त्रायलच्या नेतान्याहू नावाच्या रानटी नेत्याची पाठराखण करतात. हो चि मिन्ह हे व्हिएतनाममधील कम्युनिस्ट क्रांतीचे महान नेते होते. १९५८ मध्ये ते भारतात आले असता ते म्हणाले होते की, माझ्यासारखे शस्त्र चालवणारे क्रांतिकारक हेदेखील अप्रत्यक्षपणे गांधीजींचे अनुयायीच आहेत. १९६९ मध्ये गांधीजींची जन्मशताब्दी पूर्ण जगभर साजरी झाली होती. गांधी हा विषय जगातील अनेक विद्यापीठांमध्ये आजही अभ्यासला जातो. त्यांच्यावर असंख्य पुस्तके आहेत व अजूनही येत असतात. थोडक्यात गांधीजींच्या विचारांचा प्रसार आणि प्रभाव जगभर केव्हाच झाला होता. किंबहुना, त्यामुळेच तर ब्रिटीश दिग्दर्शक रिचर्ड एटनबरो याला गांधीजींवर चित्रपट करण्याची प्रेरणा मिळाली. १९५० पासून हा विषय त्याच्या डोक्यात होता. त्यासाठी तो अनेकदा भारतात येऊन पंडित नेहरुंनाही भेटला होता. त्यावर कोणा भारतीयाने का चित्रपट केला नाही हा सवाल रास्त आहे. पण काँग्रेसने काही केले नाही किंवा दुर्लक्ष केले हा आरोप खोटा आहे.

आधी सावरकरांना सोडा

मोदींनी हा आरोप करावा हा तर विरोधाभासांचा कहर आहे. गांधीजींचा खून केला नथूराम गोडसे याने. तो हिंदुत्ववादी होता. सावरकरांचा भक्त होता. हत्या करण्यापूर्वी मुंबईत त्याने सावरकरांची भेट घेतली होती. एकूणच सावरकरांचा गांधीहत्येच्या कटात सहभाग होता असा संशय यावा असे अनेक प्रसंग आहेत. सावरकर हे उघडपणे गांधीविरोधी होते. आज मोदी आणि त्यांचे भक्त हे याच सावरकरांचा गौरव करतात. नथूराम गोडसेला हुतात्मा ठरवण्याचा प्रयत्न भाजपशी संबंधित अनेक लोक करीत असतात. गोडसेची पुण्यतिथी साजरी करणे, त्याला पंडित गोडसे असे म्हणणे, गांधीजींच्या पुतळ्याला गोळी मारणे, गोडसेचे देऊळ उभारणे असे अनेक कारनामे या भक्तांनी केले आहेत. मोदींनी या भक्तांना जरब बसेल अशी एकही कारवाई केलेली नाही. उलट त्यांना उत्तेजन मिळेल अशीच भाषा ते एरवी करत असतात. गांधीजींमुळे देशाची फाळणी झाली, त्यांच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळालेलेच नाही असे म्हणणारे लोकही मोदींच्या कळपात आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचे नेते वरवर काहीही बोलत असले तरी आतून ते गांधीजींचा द्वेष करतात. तरीही मोदींना देशात किंवा परदेशात गांधीजींचेच नाव घ्यावे लागते. कारण, देशातील बहुसंख्य लोकांवर आजही गांधीजींची मोहिनी आहे. आणि, जगभरातील नेते व देश यांना भारताची ओळख ही गांधींमुळेच आहे. मोदी किंवा अमित शाह यांना शक्य झाले असते तर त्यांनी जागोजाग सावरकरांचे पुतळे उभारले असते व त्यांच्याच नावाचा गजर केला असता. पण त्यांना जगात तर सोडाच देशातही फार किंमत नाही. ती गांधीजींना आहे. त्यामुळे मोदींचे गांधीप्रेम हा खरे तर त्यांचा जळफळाट आहे. गांधीजींच्या शिकवणुकीच्या आधारे आजही जगाचे अनेक प्रश्न सुटू शकतील असे मोदी यांनी याच मुलाखतीत म्हटले आहे. पंडित नेहरू हेच तर म्हणत होते. पण ते असो. खोटे बोलणारा आणि झोपेचे सोंग घेणारा हे एकाच लायकीचे लोक असतात.

विचार

प्लास्टिकमुक्तीचा नवा मार्ग

मिलिंद बेंडाळे

> *जगभर प्लास्टिकमुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. माणसासह अन्य प्राणीजीवनही धोक्यात आले आहे. प्लास्टिकचे विघटन आणि पुनर्प्रक्रियेबाबत जगभर विविध दावे केले जात असले आणि प्लास्टिकच्या निर्मितीवर बंधने येत असली तरी प्लास्टिकमुक्तीचे आव्हान कायम आहे. अशा स्थितीत भारतीय शास्त्रज्ञांना लागलेला नवा शोध आशेचा किरण आहे. या शोधाने अनेक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची आशा आहे.*

आज जगात वाढता प्लास्टिक कचरा हे एक मोठे आव्हान बनले आहे. 'सिंगल यूज प्लास्टिक'ने यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अत्यंत कमी घनतेचे पॉलीथिलीन डिस्पोजेबल किराणा सामानासाठी लागणाऱ्या पिशव्या तसेच अन्न पॅकेजिंगमध्ये वापरले जाते. एवढेच नव्हे तर, पर्यावरणात सातत्याने वाढणाऱ्या कचऱ्यामुळे असंख्य समस्या निर्माण होत आहेत. आज प्लास्टिकचे सूक्ष्म कण अन्न, पाणी आणि श्वास घेत असलेल्या हवेतही विरघळले आहेत. शास्त्रज्ञांना गंगा-यमुनादी पवित्र नद्यांच्या पाण्यातही मोठ्या प्रमाणावर मायक्रोप्लास्टिक असल्याचे पुरावे मिळाले होते. अशा प्रकारे प्लास्टिकच्या अतिसुक्ष्म कणांनी आपल्या शरीरात प्रवेश केला आहे. आणखी एका संशोधनामध्ये लोक दर आठवड्याला अंदाजे पाच ग्रॅम मायक्रोप्लास्टिक कण गिळत आहेत, असे म्हटले आहे. मात्र दररोज ग्रहण केले जाणारे हे प्लास्टीक एका क्रेडिट कार्डच्या वजनाइतके आहे. यावरुनच आपण समस्येचे गांभीर्य ओळखू शकतो.

२०२२ मध्ये प्रथमच मानवी फुफ्फुसात मायक्रोप्लास्टिकचे कण आढळले होते. त्याचप्रमाणे, आत्तापर्यंत शास्त्रज्ञांना मानवी रक्त, फुफ्फुस आणि नसांमध्येही मायक्रोप्लास्टिकचे अंश सापडले आहेत. 'जर्नल एन्व्हायर्नमेंट इंटरनॅशनल' मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात न जन्मलेल्या बालकांच्या नाळेमध्येही मायक्रोप्लास्टिक्स असल्याचा पुरावा आढळला आहे. म्हणजेच आता पृथ्वी, आकाश, समुद्र, उंच पर्वत आणि अगदी दूरच्या ध्रुवापर्यंतही प्लास्टिक पोहोचले आहे. एवढेच नाही तर, शास्त्रज्ञांनी प्लास्टिकमध्ये तब्बल १६ हजार ३२५ रसायने आढळत असल्याची पुष्टी केली आहे. यातील २६ टक्के रसायने मानवी आरोग्यासाठी तसेच पर्यावरणासाठी हानिकारक असणे ही खरी चिंतेची बाब आहे. अशा स्थितीत प्लास्टिकचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहता यापासून सुटका करुन घेण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नशील आहेत.

अलीकडेच, प्लास्टिक प्रदूषणावरील आंतरराष्ट्रीय करारासाठी कॅनडाची राजधानी ओटावा येथे गांभीर्यपूर्वक विचारमंथन केल्यानंतर सर्व राष्ट्रांसाठी बंधनकारक कराराचा मसुदा मान्य करण्यात आला. तो या वर्षाच्या अखेरीस बुसान येथे पार पडणाऱ्या बैठकीत सहभागींपुढे सादर केला जाईल. आज जगातील कोणतेही राष्ट्र प्लास्टिक प्रदूषणापासून अस्पर्शित राहिलेले नाही. हे लक्षात घेऊनच संयुक्त राष्ट्रांनी अशा एका बंधनकारक करारासाठी पुढाकार घेतला आहे. प्लास्टिकच्या प्रदूषणामुळे संपूर्ण मानवजात आणि जैविक सभ्यता सातत्याने प्रभावित होत आहे. प्लास्टिक ही विसाव्या शतकातील सर्वात मोठी उपलब्धी असली तरी ती आता संपूर्ण मानवी जीवन आणि निसर्गासाठीही एक मोठे संकट बनले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक सामग्रीवर निर्बंध लादले असले तरी दर वर्षी ६०० अब्ज डॉलर किमतीचे सुमारे चारशे दशलक्ष टन प्लास्टिक तयार होते, हे विसरुन चालणार नाही. २०५० पर्यंत हेच उत्पादन वर्षाला सुमारे १०० कोटी टनांनी वाढण्याचा शक्यता वर्तवण्यात आली आहे. निश्चितच ही बाब चिंता वाढवणारी आहे.

सध्या उत्पादित होणाऱ्या प्लास्टिकपैकी केवळ नऊ टक्के प्लॅस्टिकचा पुनर्वापर होत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, बहुतेक प्लास्टिक एक तर उघड्यावर जाळले जाते किंवा इकडे तिकडे टाकले जात आहे. सहाजिकच प्रदीर्घ काळ टिकत असल्यामुळे त्याचा वापर किंवा गैरवापर सुरूच आहे. तो कमी करण्यासाठी २०४० पर्यंत सर्व प्रकारच्या प्लास्टिकचे उत्पादन ६० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्लास्टिक समर्थकांचा युक्तिवाद आहे की ते केवळ ३.५ टक्के कार्बन उत्सर्जन करते. परंतु प्लास्टिकची सहज उपलब्धता आणि व्यापकता पाहता असा अंदाज लावला जाऊ शकतो की ते पश्चिम प्रशांत महासागरात ३६ हजार फूट खोलीवर तर माऊंट एव्हरेस्ट सारख्या २९ हजार फूट उंचीवरही विपुल प्रमाणात आढळते. त्यामुळेच व्यापक जनजागृती आणि नानाविध अंगाने प्रयत्न करूनही आपल्यातील अनेकजण शरीरात प्रवेश करणाऱ्या प्लास्टिकबद्दल अनभिज्ञ आहेत. प्लास्टिकसोबतच आरोग्याला घातक असणारी अनेक रसायने सजीवांच्या शरीरात शिरली असून आपल्याला त्यांची कल्पना नाही. बहुधा या पृथ्वीवर प्लास्टिक नसणारे एकही ठिकाण आता उरले नसेल. प्लास्टिकचे सूक्ष्म कण अन्न, पाणी, कपडे इत्यादींमधून शरीरात प्रवेश करतात. सध्या सौंदर्यप्रसाधने आणि आरोग्यसेवेसाठीही प्लास्टिकचा वापर केला जात आहे. वीस वर्षांपूर्वी प्रथमच लहान म्हणजेच दोन ते पाच मिलीमीटर आकाराचे प्लास्टिकचे कण सापडले. ते प्लास्टिकच्या मोठ्या तुकड्यांमधून तयार झाले होते.

यथावकाश 'नॅनो प्लास्टिक'चा शोध लागला. हे प्लास्टिक अत्यंत सूक्ष्म आकाराचे आहे. या सूक्ष्म आकारामुळेच नॅनो प्लास्टिक सामान्य नजरेपासून लपून राहते आणि विविध माध्यमांद्वारे आपल्या शरीरात पोहोचल्यानंतर ऊतकांमध्ये जमा होते. पुढे याचेच दूरगामी परिणाम करतात. कर्करोग आणि मेंदूतील रक्तस्रावांसारख्या गंभीर परिस्थितीला शरीर प्रवेश केलेले प्लास्टिक हे एक प्रमुख कारण आहे. आता ही बाब विविध अभ्यासातून स्पष्ट झाली आहे. मात्र प्लास्टिकमुक्त पर्यावरणाच्या संकल्पनेतील सर्वात मोठा अडथळा अर्थपूर्ण पर्यायाचा अभाव हा आहे. काही पर्याय सुचवले असले तरी, ते वापरण्याच्या दृष्टीने सोपे नाहीत.

मात्र या गंभीर समस्येतून सुटका मिळवण्यासाठी प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याची व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत अभियानानंतर भारतात प्लास्टिकच्या वापरात लक्षणीय घट झाली आहे. अनेक 'स्टार्ट अप्स' च्या माध्यमातून प्लास्टिक संकलन, पृथक्करण आणि पुनर्वापराच्या कामाला गती मिळाली आहे. पण हे सर्व प्रयत्न सूक्ष्म आणि 'नॅनो प्लास्टिक'ला रोखण्यासाठी प्रभावी ठरत नाहीत. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती वैयक्तिक पातळीवर प्लास्टिक वापरण्यापासून परावृत्त होत नाही, तोपर्यंत या समस्येपासून मुक्ती मिळणे अशक्य आहे. प्लास्टिक उत्पादन कमी करण्यासाठी धोरणात्मक पातळीवर कठोर पावले उचलावी लागतील. प्लास्टिकला योग्य पर्याय मिळेपर्यंत पुनर्वापरास प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारावे लागेल. प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची ही बाबही अभ्यासपूर्वक ठरवावी लागेल कारण उघड्यावर टाकले जाणारे प्लास्टिक सर्वाधिक विनाशकारी ठरत आहे.

थोडक्यात, या माध्यमातून होऊ पाहणारा विश्वाचा विनाश टाळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला जबाबदार रहावे लागेल. शेवटी प्लास्टिकचा कमीत कमी किंवा प्रतिबंधित वापरच आपल्या हिताचा आहे. हे सगळे लक्षात घेता भारतीय शास्त्रज्ञांनी एक प्रकारची बुरशी शोधून काढली असून ती कमी जाडीचे प्लास्टिकही लवकर नष्ट करू शकते. चेन्नईच्या भारतीदासन आणि मद्रास विद्यापीठाच्या संशोधकांनी हा शोध लावला असून त्याचे परिणाम 'नेचर सायंटिफिक रिपोर्टस' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. संशोधकांनी 'क्लाडोस्पोरियम स्फेरोस्पर्मम' नावाच्या या बुरशीला सूक्ष्म जीवांचा संसर्ग झालेल्या मायक्रोप्लास्टिक्सच्या तरंगत्या ढिगाऱ्यापासून वेगळे केले. ही बुरशी डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्या बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पॉलिमरचे त्वरित विघटन करण्यास तसेच त्याचे वजन कमी करण्यास मदत करू शकते, असे दिसून आले आहे. प्लास्टिक नष्ट करण्यास मदत करणाऱ्या अशा बुरशीची ओळख याआधीही झाली असली तरी त्यांचा प्लास्टिक तोडण्याचा वेग कमी होता. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांनी शहरी कचऱ्याच्या ढिगांवर तसेच दूषित पाण्यात तरंगणाऱ्या प्लास्टिकच्या तुकड्यांवर आढळलेल्या ३३ बुरशीच्या प्रजातींचे परीक्षण केले आहे. याद्वारेच प्लास्टिकचा जलद नाश होण्यास मदत होणारी बुरशी ओळखली जाते. यासंबंधीच्या अभ्यासात २८ प्रकारच्या बुरशीमध्ये अत्यंत कमी घनतेचे पॉलीथिलीन (एलडीपीई) तोडण्याची क्षमता असल्याचे आढळून आले आहे. चाचणीमध्ये 'क्लाडोस्पोरियम स्फेरोस्पर्मम' नावाच्या बुरशीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याचे समोर आले. हा शोध किती महत्त्वाचा आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

प्लास्टिकमध्ये १६ हजाराहून अधिक रसायने आहेत. केवळ माणसांमध्ये नव्हे तर उत्तराखंडच्या जंगलात हत्तींच्या शेणातही प्लास्टिकचे अंश सापडले. ही मोठ्या धोक्याची चिन्हे आहेत. आजही भारतातील ६७ टक्के ग्रामीण कुटुंबे प्लास्टिक कचरा जाळतात. असे असताना प्लास्टीकचे लवकर विघटन करणाऱ्या या बुरशीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही बुरशी विघटनासाठी विशेष एंजाइम सोडते. त्यामुळे प्लास्टिकचे अतिसुक्ष्म तुकडे होतात. एकदा प्लास्टिकच्या तुकड्याची रचना कोलमडून त्यामध्ये भेगा, खड्डे आणि छिद्रे निर्माण झाली की पृष्ठभागही खडबडीत होतो. या बदलांमुळे प्लास्टिकच्या तुकड्यांचे वजन एका आठवड्यात १५.२ टक्क्यांनी कमी होते तर ३१ दिवसांमध्ये त्यात तब्बल ५० टक्क्यांनी घट होऊ शकते. याचा अर्थ बुरशी प्लास्टिकचे तुकडे नष्ट करण्यास मदत करते. त्यामुळेच तिचा वापर वाढला तर पृथ्वीवरील प्लास्टिक नष्ट करण्यास मोठी मदत होऊ शकेल, यात शंका नाही.

आजकाल

प्रशांत किशोर नावाचा एक बनावट विश्लेषक

तुषार गायकवाड

राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर म्हणजे राजकारणातील रमर पिल्लई. आता रमर पिल्लई कोण? तर १९९६ च्या दशकात पेट्रोल पाहण्यापासून हर्बल पेट्रोल तयार करुन विकणारा अवलिया. पिल्लईने चक्क तामिळनाडूचे तत्कालीन मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनाही गंडवून १० एकर जागा व ५० कमांडोंची फौज संरक्षणासाठी घेतली होती.

पिल्लईच्या हर्बल पेट्रोलने जगभरातील शास्त्रज्ञांना वेड लावले होते. सुमारे ३ वर्षे पिल्लई पैसे छापत राहीला. त्याच्या हर्बल पेट्रोलचे पेट्रोल पंपही तामिळनाडूत उभारले गेले. मात्र जेव्हा आयआयटीने या प्रकरणाचा तपास केला तेव्हा पिल्लईने सर्वांना गंडवलंय हे लक्षात आले. मग तिथून पुढे पिल्लईचा सन्मान सीबीआयने केला. तेव्हा त्याने आपण लोकांना गंडवल्याचे कबूल केले.

असो. तर सन्माननीय प्रशांत किशोर हे राजकीय रणनीतीकार म्हणून प्रसिध्द असले तरी त्यांना ठोस असा विचारधारेचा बेस नाही. हा मनुष्य २०१२ पासून मोदींना पंतप्रधान करण्यासाठी काम करत होता. सोशल मेडीयाच्या माध्यमातून शेठची प्रतिमानिर्मिती, तथाकथित विकासाचे गुजरात मॉडेलचे विविध फोटोशॉप, डॉ. मनमोहन सिंग, सोनिया गांधी यांच्या बद्दल खोटे लिखाण प्रसवणे वगैरे करण्यात प्रशांत किशोरचा वाटा होताच.

२०१४ मध्ये शेठ पंतप्रधान झाले आणि प्रशांत किशोरला ट्रोजन हॉर्स म्हणून वापरण्याची कल्पना पुढे

आली. त्यातूनच प्रशांत किशोरने आधी बिहार मध्ये नितीशकुमार आणि नंतर पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी यांच्यासोबत काम केले. मोदी, नितीशकुमार व ममता बॅनर्जी यांच्या विजयात प्रशांत किशोरचा सिंहाचा वाटा आहे असे दाखवण्यात आले.

मग ज्या काळात काँग्रेस स्वतःच्या पक्ष घटनेला तिलांजली देवून पूर्णवेळ अध्यक्षाविना अंधारात चाचपडत होती. त्या काळात प्रशांत किशोर काँग्रेस मध्ये घूसून गांधी कुटुंबीयांनी पक्ष संघटनेतून बाहेर पडावे असा मनसुबा घेऊन काम करायला तयार झाले. पण अशा लोकांना बळी पडेल ती काँग्रेस कसली?

काँग्रेसने प्रशांत किशोरला कोलले. सन २०२० मध्ये बिहार विधानसभा निवडणूकीत प्रशांत किशोर यांनी भाजपला ग्राउंड तयार करुन देण्यासाठी जनसुराज यात्रा वगैरे काढली. पण ऐन निवडणुकीच्या काळात साडेतीन महिने गायब झाले. अर्थातच तेव्हा नितीशकुमार यांचा पक्ष संपवून भाजपा वरचढ ठरली. मात्र तेजस्वी यादवच्या करिष्यामुळे भाजपाने गपचूप नितीशकुमारांना मुख्यमंत्री पदी ठेवले.

बिहार मध्ये भाजपचा मुख्यमंत्री करण्याचा प्रशांत किशोरचा मनसुबा उधळला गेला. त्यानंतर त्यांनी परत एकदा २०२२ मध्ये काँग्रेसशी जवळीक करण्याचा प्रयत्न केला. मात्र तोसुध्दा फसला. आता लोकसभेच्या निवडणुकीत उरलेल्या दोन टप्प्यांत होणाऱ्या मतदानात कुंपणावरच्या मतदाराने भाजपला मतदान करावे यासाठी 'भाजप पूर्ण बहुमताने सत्तेवर येणार' असा दावा करायला प्रशांत किशोर यांना कोणी पुढे आणले हे सांगायला नकोच!

उर्वरित दोन टप्प्यांत भाजपला आजवरच्या सर्व टप्प्यांपेक्षा कमी मतदान होणार आहे. संपूर्ण एनडीए २३०+ जाईल अशी स्थिती दिसत नाही. रॅली काढण्यासाठी ७,५०० पोलीसांची फौज उतरवली जात असेल तर ओळखून जा ४ जूनचा निकाल काय असेल?

साभार

लोकसंसद

हिंजवडी येथील ३७ कंपन्यांचे स्थलांतर

पुण्याजवळ हिंजवडी येथे २००० साली तत्कालीन दूरसंचार मंत्री प्रमोद महाजन व राज्याचे उद्योगमंत्री पतंगराव कदम यांचे हस्ते पुण्याजवळील हिंजवडी येथे आय टी पार्कची स्थापना करण्यात आली होती. या ठिकाणी सुमर्फे १५० हुन अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या काम करतात. साहजिकच देशातील लाखो आय टी इंजिनिअर्स येथे काम करतात त्यांना रोजगार तर मिळाला आहेच शिवाय अनेक छोटे उद्योग सुद्धा सुरु झाले आहेत. हा परिसर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अखत्यारीत येतो. पुणे पिंपरी चिंचवड येथील अनेक अभियंत्यांना येथे जाण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मुख्य म्हणजे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. याशिवाय कंपन्यांमध्ये येणारे अनेक पाहुणे, अधिकारी यांना सुद्धा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. याशिवाय जवळपासच्या परिसरात नागरी सुविधा नाहीत. त्यामुळे अनेक कंपन्यांनी स्थलांतर केले आहे. गेल्या चार वर्षात सुमारे ३७ कंपन्यांनी येथून स्थलांतर केले असून त्या आता मगर पट्टा सिटी , चेन्नई व हैदराबाद अशा ठिकाणी गेल्या आहेत ही बातमी नुकतीच वाचली वास्तविक महाराष्ट्राच्या उद्योग खात्यांने या प्रशाकडे लक्ष देणे आवश्यक होते.

- शांताराम वाघ, पुणे

मराठी साहित्यिक दिनविशेष

१ जून

१८३४ : कोशाकार, व्याकरणकार, भाषांतरकार डॉ. विल्यम कैरे यांचा जन्म, १८७२ : 'चाफा बोलेना, माझी कन्या' अशी आजही रसिकांच्या ओठावर असलेल्या कविता लिहिणारे नारायण मुरलीधर गुप्ते उर्फ 'बी' यांचा जन्म. ५० कविता त्यांनी लिहिल्या, त्या 'फुलांची ओंजळी' या संग्रहात आहेत. त्यापैकी 'कमला' हे उत्कृष्ट काव्य मानले जाते. **१८९४ :** आपल्या कादंबरीतून स्त्रियांचे प्रश्न हाताळणाऱ्या कादंबरीकार इंदिरा गंगाधर सहस्त्रबुद्धे यांचा जन्म. यांनी तत्कालिन नियतकालिकांतून लेखन केले. 'बाळूताई! घडा घे ' या कादंबरीतून स्त्रियांचे हक्क, व्यक्ती स्वातंत्र्य हे विचार मांडले. याशिवाय 'गोदावरी', केवळ हे ध्येयासाठी या अनुवादीत कथा त्यांच्या प्रसिद्ध झाल्या आहेत. **१९०७ :** पत्रकार ते संपादक असा वृत्तपत्रीय प्रवास करणारे लेखक संगीत नाटककार हणमंत रामचंद्र महाजनी यांचा जन्म. १९१२ : वेदसाहित्य भारतीय संस्कृती, धर्म, तत्वज्ञान, शास्त्र आदी विषयांचे चिकित्सक अभ्यासक व लेखक विनायक वसंत करंबळेकर यांचा जन्म. 'भारतीयांचा सांस्कृतिक उत्कर्ष' या ग्रंथातून त्यांनी संस्कृतीच्या उत्कर्षांचा ऐतिहासिक आलेख चित्रबद्ध केला. 'संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास' या ग्रंथातून संस्कृत साहित्याच्या उगमापासूनचा आढावा घेतला. 'अथर्ववेद आणि आयुर्वेद' या ग्रंथातून अथर्ववेदात विविध रोगांवर सांगितलेले मंत्रतंत्र, उपचार यांचा आढावा घेतला. तसेच 'प्राचीन भारतीय शब्दशास्त्र' या ग्रंथातून वाणीच्या उत्पत्तीचे वैदिक संदर्भापासून सुरूवात करून स्फोटवाद, ध्वनीविचार, ध्वनीचे तत्वज्ञान, पदविभाग, पदांचा लिंगविचार, उपसर्ग इत्यादींची शास्त्रशुद्ध चर्चा केली. 'शब्दशास्त्र विषयक' ग्रंथ म्हणून मराठीच्या दृष्टीने हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांच्या लेखनातून ग्रंथ विषयीचा सखोल अभ्यास, चिकित्सक दृष्टी, परिश्रमशीलता याचा प्रत्यय दिसून येतो. **१९२२ :** लेखक मोरेश्वर रघुनाथ ठकार यांचा जन्म. **'ललिना' ही कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे.** **१९२४ :** लेखक स.फ. आजगावकर यांचा जन्म. यांचे 'ओवी नामामृतसार', 'भाव माझ्या अंतरीचे', 'सोहं व्यान तरंग' ह्या काव्यसंग्रह 'कृपेची साऊली- माऊली माझी', हे चरित्र ग्रंथ प्रकाशित झाला आहे. १९२६ : 'कट्यार काळजात घुसली' या गाजलेल्या संगीत नाटकाचे नाटककार, दिग्दर्शक पुरूषोत्तम व्यंकटेश दारव्हेकर यांचा जन्म. **१९२८ :** लेखिका सरोजिनी विनायकराव दुर्गे यांचा जन्म. 'इसापनीती भाग १, २' 'कथामंजुषा भाग १ ते ५', 'बिरबलाचे चातुर्य' अशी पुस्तके त्यांनी लिहिलीत. **१९३० :** लेखक समाजसुधारक बाबा आढाव यांचा जन्म. अस्पृश्यांच्या विहिरीच्या पाण्यासंबंधीच्या चळवळीतून 'एक गाव एक पाणवठा' या पुस्तकाची निर्मिती. याशिवाय संघापासून सावध, आधुनिक शेटजी-भटजींचे दास या पुस्तकांशिवाय विविध वृत्तपत्रातून सामाजिक विषयांवर स्फुटलेखन केले. १९३४ : कवी, नाटककार, विनोदी लेखक, निबंधकार, साहित्यसमीक्षक आणि भारतीय ज्योर्तिगणिताचे अभ्यासक व विवेचक साहित्यिक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे निधन. लेखनाचा श्रीगणेशा समीक्षेच्या माध्यमातून. 'विक्रमशशिकला' आणि 'शापसंभ्रम' या नाटकांवरील त्यांच्या समीक्षा गाजल्या. 'जन्मरहस्य', 'मनविकार' हे कथासंग्रह. 'गीतेपायन' हा काव्यसंग्रह याशिवाय लघुकथा, कादंबऱ्या, नाटके, विनोद आदी क्षेत्रात विपुल लेखन करून मराठी साहित्याचे दालन त्यांनी समृद्ध केले. **१९३७ :** कथाकार प्रा. मुरलीधर जनार्दन कुलकर्णी यांचा जन्म. 'टाकीत कावळा', 'थोरला', 'पेमंट' ह्या त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. **१९४० :** विविध नियतकालितांतून सातत्याने लेखन करणारे महादेव कान्हुजी गव्हाणे यांचा जन्म. 'जहागीरदार' हे ग्रामीण जीवनावरील सामाजिक नाटक त्यांच्या नावावर आहे. **१९४१ :** कथा, कविता, प्रवासवर्णन आदी स्वरूपाचे लेखन करणारे आत्माराम लालू तोरणे यांचा जन्म. 'मुंबई ते लंडन', 'लंडन ते न्यूयॉर्क' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९४३ :** लेखक, विचारवंत संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक आणि चार्वाक दर्शनाचे चिकित्सक अभ्यासक डॉ. अण्णा हरी साळुंके यांचा जन्म. 'शंबूक' या विषयावरील लेखांसह विश्वकोशातून तुलनात्मक धर्मशास्त्रावर १०० हून अधिक लेख. 'विद्रोही तुकाराम' ह्या ग्रंथासह अनेक वैचारिक ग्रंथ प्रकाशित. 'सत्ता गेली', 'हीच मराठी समाजाला सुवर्णसंधी'या त्यांच्या लेखाने ८०च्या दशकात मोठी खळबळ उडवली. अनेक विचार प्रवर्तक ग्रंथांचे ते कर्ते. त्यामध्ये हिंदू संस्कृती आणि स्त्री, 'धर्म की धर्मापलीकडे', 'म. फुले आणि धर्म', 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती', 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी', 'तुकारामांचा शेतकरी', 'तुळशीचे लग्न : एक समीक्षा' तसेच 'स्वातंत्र्याचे भय' हा अनुवादित ग्रंथ. **१९४४:-** लेखक प्रा.भगवान द. पाटील यांचा जन्म. 'सई' या कथासंग्रहासह कर्मवीर भाऊराव पाटलांचे १४ अध्यायात १८०० ओळींचे 'कर्मवीर गाथा' हा चरित्र ग्रंथ प्रसिध्द. याशिवाय आतापर्यत विविध दिवाळी अंकातून कथा, कविता प्रसिध्द. **१९४५:-** नाट्यलेखक वामन गोविंद कोकाटे यांचा जन्म. ह्यांची 'दीप जळे वादळात', 'नयनातले आसू गाती', 'पुण्य हवे नशिबात', 'फूल विसरते सुगंधा ला', 'सुवर्णसुंदरी', 'सांग फुला सांग मला' आदी नाटके त्यांच्या नावावर आहेत. **१९४५:-** 'मी','पृथ्वी आणि प्रवास' या जगप्रसिद्ध पुस्तकाचे लेखक एकनाथ किसन वाणी यांचा जन्म. **१९४६:-** लेखक भीमसेन कृष्णा देठे यांचा जन्म. 'इस्कोट' ही कादंबरी आणि 'होरपळ' हा काव्यसंग्रह अयाी साहित्य संपदा. **१९५०:-** महाविद्यालयात ज्यु. क्लार्क ते रजिस्टार असा प्रवास करणारे आणि या प्रवासात आपले कामकाजांच्या अनुभवावर बेतलेले 'महाविद्यालय कार्यालयीन कामकाज' या पुस्तकाचे लेखक श्री. व्ही. एम. शेवाळे ह्यांचा जन्म. **१९५२:-** लेखक संत प्रभुदास बाळबुधे यांचा **जन्म**. यांनी 'ताज मेहंदी बाबा' यांच्या चरित्रासह त्यांच्या नावाचे भजन व आरती संग्रह लिहिले आहेत.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ जून

१) श्री. जीवन बाळाराम लोहार, चौलमळा, अलिबाग, १-१-१९५८
२) मुकुंदराव रामचंद्र भोसले, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९४१
३) श्रीम. विजया विद्याधर चौधरी, अलिबाग, १-१-१९४७
४) श्री. चिंतामण नथुराम म्हात्रे, चेंढरे, अलिबाग, १-१-१९४८
५) श्री. देवराम रामा म्हात्रे, रामनाथ, अलिबाग, १-१-१९४४
६) श्री. सुरेश विठ्ठल मापुस्कर, वरसोली, अलिबाग, १-१-१९४२
७) श्रीम. मंगला सुरेश मयेकर, किहीम, अलिबाग, १-१-१९४९
८) श्री. प्रमोद भास्कर गुरव, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५०
९) श्री. पांडुरंग शिवराम पाटील, अलिबाग, १-१-१९५०
१०) श्री. रामचंद्र शंकर लोकरे, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९५०
११) श्री. चंद्रकांत गोविंद पाटील, आक्षी, अलिबाग, १-१-१९५०
१२) श्री. काशिनाथ गोविंद थळे, खंडाळा, अलिबाग, १-१-१९५०
१३) श्री. मनोहर मोरेश्वर पाटील, नवगाव, अलिबाग, १-१-१९४७
१४) श्रीम. विद्या दामोदर पाटील, पिंपळभाट, अलिबाग, १-१-१९४९
१५) श्री. तुकाराम ताथू सोनावणे, अलिबाग, १-१-१९५१
१६) श्री. दुर्वास वाळकू खंडपेकर, थळ, अलिबाग, १-१-१९४९
१७) श्री. यशवंत सखाराम पाटील, थळ, अलिबाग, १-१-१९५०
१८) श्री. हिराचंद अंबाजी पिंगळे, अलिबाग, १-१-१९४६
१९) श्रीम. सुजाता गुरूनाथ वार्डे, अलिबाग, १-१-१९४९
२०) श्री. सुरेश महादेव गुरव, अलिबाग, १-१-१९५२
२१) श्री. वासुदेव अंबाजी शेडगे, अलिबाग, १-१-१९५२
२२) श्रीम. मेधा मोहन पाटील, अलिबाग, १-१-१९५१
२३) श्री. रामदास गोविंद थळे, मल्याण, अलिबाग, १-१-१९५२
२४) श्रीम. कुसुम जनार्दन पाटील, अलिबाग, १-१-१९४३
२५) श्री. हरिश्चंद्र भिवा पडवळ, वरसोली, अलिबाग, १-१-१९५२
२६) श्रीम. साखरबेन चंद्रकांत गडा, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९४६
२७) श्री. हिरालाल वीरजी जैन, अलिबाग, १-१-१९४७
२८) श्री. सुधाकर मधुकर जंगले, अलिबाग, १-१-१९४९
२९) श्री. अमर रामचंद्र म्हात्रे, पंतनगर, अलिबाग, १-१-१९४४
३०) श्री. राजाराम बालकृष्ण पाटील, कुरूळ, अलिबाग, १-१-१९५३
३१) श्री. जगदीश शांताराम थळे गोंधळपाडा, अलिबाग, १-१-१९४९
३२) श्री. सुरेश राजाभाऊ ठाकरे, वरसोली, अलिबाग, १-१-१९५४
३३) श्री. विठोबा सदाशिव पाटील, कुरूळ, अलिबाग, १-१-१९५४
३४) श्री. विश्वास चंदू फडतरे, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९५०
३५) श्री. विष्णू निळकंठ बापट, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५४
३६) श्री. परशुराम विठ्ठल माळी, अलिबाग, १-१-१९४७
३७) श्री. परशुराम दत्तात्रेय म्हात्रे, धोकवडे, अलिबाग, १-१-१९५४
३८) श्रीम. कीर्ती केसरीनाथ पाटील, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५५
३९) श्रीम. सुनिता शंकर सुतार, अलिबाग, १-१-१९५१
४०) श्रीम. शरयू शशिकांत पाटील, वरसोली, अलिबाग, १-१-१९५५
४१) श्री. मनोहर पोसू पाटील, कुरूळ, अलिबाग, १-१-१९५५
४२) श्री. प्रभाकर गणपत गोळे, वेश्वी, अलिबाग, १-१-१९५४
४३) श्री. सुधाकर मुकुंद पाटील, कुरूळ, अलिबाग, १-१-१९५४
४४) श्री. विलास जानू तांडेल, कोळीवाडा, अलिबाग, १-१-१९५६
४५) श्रीम. रेखा मनोहर खराडे, खंडाळे, अलिबाग, १-१-१९६६
४६) श्रीम. कस्तुरी मल्लीकार्जुन जकापुरे, अलिबाग, १-१-१९५२
४७) श्री. जयपाल परशुराम पाटील, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५६
४८) श्री. रामचंद्र सोम्या साखरकर, अलिबाग, १--११९५६
४९) श्री. हरिश्चंद्र मुरलीधर पाटील, पिंपळभाट, अलिबाग, १-१-१९५४
५०) श्री. हरिश्चंद्र सखाराम नाईक, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५४
५१) श्री. सुनील पोपटराव पाटील, श्रीबाग, अलिबाग, १-१-१९५७
५२) श्री. बामा हाशू जैतू, नवगाव, अलिबाग, १-१-१९४९
५३) श्री. ज्ञानेश्वर जानू नवगावकर, कोळीवाडा, अलिबाग, १-१-१९५७
५४) श्री. वामन कृष्णा म्हात्रे, पिंपळभाट, अलिबाग, १-१-१९५७
५५) श्री. अनंत सखाराम मुलुस्कर, वेश्वी, अलिबाग, १-१-१९५६
५६) श्री. लक्ष्मण गजानन कावळे, नवगाव, अलिबाग, १-१-१९५६
५७) श्री. नागनाथ शंकर जैतू, नवगाव, अलिबाग, १-१-१९५६
५८) श्री. विनायक हरिश्चंद्र चव्हाण, नवगाव, अलिबाग, १-१-१९५७
५९) श्री. दत्तात्रेय बाबू आढाव, अलिबाग, १-१-१९४२
६०) श्री. गोकुळ दशरथ कोळी, नवगाव, अलिबाग, १-१-१९५३
६१) श्री. पोषणा इलणा बेजकल, अलिबाग, १-१-१९५४
६२) श्री. यशवंत तुकाराम घरत, थळ, अलिबाग, १-१-१९५८
६३) श्री. कैलास मारूती पिंगळे, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९५८
६४) श्रीम. किशोरी केसरीनाथ चिंबुलकर, विद्यानगर, अलिबाग, १-१-१९५८
६५) श्री. मनोहर गणपत पाटील, खंडाळा, अलिबाग, १-१-१९५७
६६) श्रीम. अरूणा अरविंद कालवणकर, किहीम, अलिबाग, १-१-१९४८
६७) श्री. चंद्रकांत जनार्दन पाटील, चेंढरे, अलिबाग, १-१-१९४८
६८) श्रीम. सुनंदा चंद्रकांत पाटील, चेंढरे, अलिबाग, १-१-१९५३
६९) श्रीम. गीता दिनानाथ जुईकर, अलिबाग, १-१-१९५५
७०) श्री. केदार राघा रोगे, नवगाव, अलिबाग, १-१-१९५८
७१) श्री. प्रभाकर शंकर शिंदे, वरसोली, अलिबाग, १-१-१९५३
७२) श्री. नंदकुमार कानू घरत, वरसोली, अलिबाग, १-१-१९५८
७३) श्री. किशोर जनार्दन विरकूड, थळ, अलिबाग, १-१-१९५७
७४) श्री. बादशाहा शंकर भांगरे, वेश्वी, अलिबाग, १-१-१९५९
७५) श्री. गजानन हरिश्चंद्र कोळी, अलिबाग, १-१-१९५०
७६) चंद्रकांत नामदेव शिंदे, अलिबाग, १-१-१९६०
७७) श्री. राजन गोपीनाथ कुलकर्णी, अलिबाग, १-१-१९६१
७८) श्रीम. सुनंदा नारायण चव्हाण, अलिबाग, १-१-१९५३
७९) श्री. मेघनाथ गोपाळ मुंडे, अलिबाग, १-१-१९५०
८०) श्री. वसंत यशवंत पाटील, कामार्ले, अलिबाग, १-१-१९५३
८१) श्री. अजित चिंतामण पाटील, नवगाव, अलिबाग, १-१-१९६३
८२) श्री. शरद नथू पाटील, अलिबाग, १-१-१९६३
८३) श्री. विजय जयवंत घरत, सासवणे, अलिबाग, १-१-१९५९
८४) श्रीम. जयश्री गजानन पोपट, चेंढरे, अलिबाग, १-१-१९६०
८५) श्री. कैलास रामभाऊ वरसोलकर, अलिबाग, १-१-१९५८

भक्ती पवार दहावीत प्रथम

रसायनी : मोहोपाडा गावची भक्ती सुधीर पवार हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८० टक्के गुण प्राप्त करुन रिस येथील संजीवनी प्रायमरी शाळेतून दहावीत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. भक्तीला लहानपासूनच अभ्यासाची आवड आहे. वडील सुधीर पवार, आई साक्षी पवार, काका गणेश पवार यांच्यासह शाळेतील शिक्षकांचा आपल्या यशात मोठा वाटा असल्याचे भक्तीने सांगितले.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालक श्रीमती. मिनाक्षी विजय भार्गव यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

परिशिष्ट

मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

अनु.नं.	मौजे	गटक्रमांक	क्षेत्र हे. आर. चौ. मी.	आकार रू.पैसे
१)	मापगांव	११८	०-२६-०० पो.ख.०-०२-१० एकूण ०-२८-१०	०-५०
२)	मापगांव	११९	०-०३-००	०-०६
३)	मापगांव	१२२	०-२४-०० पो. ख.०-०२-१० एकूण ०-२६-१०	०-४५
४)	मापगांव	१२३	०-३१-१० पो.ख.०-०२-०० एकूण ०-३३-१०	०-५८

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्याविकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही त-हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०१/०६/२०२४

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कौशल अश्विन गांधी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार
सारळ	७७	०-३४-२० पो.ख. ०-०२-८० एकुण ०-३७-००	रु. ७.१२

सदरची मिळकती ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०१/०६/२०२४

ॲड. विधान अरविंद पाटील
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. सतीश बळीराम पाटील, रा.डी/१२, विहंग अपार्टमेंट,कोतवाल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

मौजे मानकिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील

स.नं.	हि. नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
२	१/अ/२	०-४०-०० यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२०-००	०-३७

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १/०६/२०२४

ॲड. तुषार रामचंद्र भवारे
श्रावणधारा को. ऑप. हौ.सो. ब्राम्हण आळी.
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक आशिष चारूदत्त देसाई, सी विंग, फ्लॅट नं. ५०४, मिनो मिनार को. ऑप. हौ. सोसा., कोर्ट यार्ड रेस्टॉरंटच्यावर, विरा देसाई रोड, अंधेरी (वे.) मुंबई - ४०००५३ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

स.नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रू. पै.)
२८	२/अ	०-४१-२० पो.ख. ०-०६-३० एकूण ०-४७-५० यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२७-५०	४-८१

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक : ०१/०६/२०२४

अशिलांतर्फे ॲडव्होकेट
ॲड. मनिषा पुंडलिक गायकर
मु.पाली तर्फे वरेडी,ता.कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९७०५९५९५२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे कारिवणे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत

मालकाचे नाव	गट नं	एकूण क्षेत्र हे आर	आकार रु.पै.	प्रकार
भगवान दयाराम जाधव व इतर	११/२	वरकस १-४७-०० पो.ख. ०-४९-०० १-९६-००	१=०६	खालसा

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०६/२०२४

सही/
ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क्र. ९२७२७९३९५६

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये १) अशोक जसराज जैन, २) जावेद फैझुल्लहा तापिया, ३) अझीम फैझुल्लहा तापिया, ४) अमोल जगदीश कपाडिया (स्वतःसाठी व मयत सुशीला जगदीश कपाडिया यांच्या मृत्युपत्राचा हयात निष्पादक म्हणून) ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

अनुसूची
(मालमतेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४०३/१, एकूण क्षेत्र ०२.०१.७० (है.आर.चौ.मी.) आकार २४ रु. ३६ पै. व भूमापन क्रमांक व उपविभाग ४८७, एकूण क्षेत्र ००.५२.०० (है.आर.चौ.मी.) आकार ९५ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/५/२०२४
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे रहाटाड, ता. तळा, जि. रायगड येथील मिळकत

मालकाचे नाव	गट नं	एकुण क्षेत्र हे आर	आकार रु. पै	प्रकार
जनार्दन नथुराम खेडेकर व इतर ७	२६४/अ	जिरायत ०-४३-३० पो.ख. ०-०३-५० ०-४६-८०	६=००	नि.स.प्र

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालू असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०६/२०२४

सही /
ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क. ९२७२७९३९५६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, श्री. सुरेश बाळाराम जोशी, रा.खवली, ता. सुधागड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा अमर सुरेश जोशी याच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांनी त्याचा जन्म दि. १२/०८/१९९३ रोजी मौजे- खवली, ता.सुधागड.जि.रायगड येथे झाला आहे परंतु त्याची नोंद अद्यापर्यंत केली नाही असे नमुद केले आहे.

सदरहू अमर सुरेश जोशी यांच्या जन्म नोंदीचा तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस आज २४/०५/२०२४ रोजी पेपर नोटीस प्रसिद्धीकरीता माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण:- सुधागड पाली
दिनांक :- २४/०५/२०२४

सही/-
(उत्तम कुंभार)
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

कॅनरा बँक उरण मोरा शाखा, पत्ता : उरण मोरा

शाखेचा संदर्भ क्र. : ५२११/७७३/३२५,
दि. २९.०५.२०२४

ताबा सूचना

ज्याअर्थी,

अधोहस्ताक्षरित कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा ५४/२००२) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३(१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये **कर्जदार श्री. नौशाद इब्राहिम मुकाबी,** राहणार फ्लॅट क्र. २०३, २ रा मजला, गॅलेक्सी अपार्टमेंट, गाव उरण, पिन - ४०० ७०४ यांना सूचनेत निर्देशित रक्कम **रु. ४,२०,५७९.१८ (रु. चार लाख वीस हजार पाचशे एकोणऐंशी व अठरा पैसे मात्र)** अधिक लागू न केलेले व्याज व प्रभार रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या प्राप्तीपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. ०२.०३.२०२४ (०२ मार्च, २०२४) जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ व ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. २९ मे, २०२४ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदारांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये व मालमत्तेसंदर्भातील कोणताही व्यवहार हा कॅनरा बँक, उरण मोरा शाखा यांच्या प्रभारांतर्गत रक्कम **रु. ४,२०,५७९.१८ (रु. चार लाख वीस हजार पाचशे एकोणऐंशी व अठरा पैसे मात्र)** अधिक त्यावरील व्याज रकमेच्या अधीन असेल.

स्थावर मालमत्तेचे विवरण

फ्लॅट क्र. २०३, २ रा मजला, गॅलेक्सी अपार्टमेंट, सीटीएस क्र. १८२/ए धारक जमिनीवरील, गाव मोरा, कॅनरा बँक (ई-सींडिकेट बँक) जवळ, मोरा रोड, उरण.

दिनांक : २९.०५.२०२४
ठिकाण : उरण

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे

श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय नविन पनवेल (रायगड)

(मराठी व इंग्रजी माध्यम)

महाराष्ट्र शासन व एन.सी.टी. ई मान्यताप्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये

व्यवस्थापन कोटा
डी. एल. एड (डी. एड.) प्रवेश २०२४ - २५ साठी

जागांकरीता अर्ज मागवित आहे.

- * **शैक्षणिक पात्रता :** इ. १२ वी मागासवर्गीयांसाठी ४४.५०% गुण व खुला गट ४९.५०% गुणांसह उत्तीर्ण MCVC विद्यार्थ्यांना १. कृषी गटातील हार्टीकल्चरल व कॉप सायन्स किंवा २. आरोग्य व वैद्यकिय सेवा गटातील कॅच ॲण्ड प्रिस्कूल मॅनेजमेंट विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- * YCMOU मधून FYBA किंवा पदवी उत्तीर्ण
- * शाखानिहाय व माध्यमनिहाय उपलब्ध जागा :

माध्यम	विज्ञान	कला	वाणिज्य	एकूण
मराठी	०५	०४	०१	१०
इंग्रजी	०५	०४	०१	१०

संवर्गनिहाय उपलब्ध जागा :

माध्यम	खुला	एससी + एसटीव्हीजे + एनटीबी + एनटीसी + एनटीडी	एसबीसी + ओबीसी	एकूण
मराठी	५	४	१	१०
इंग्रजी	५	४	१	१०

उपलब्धतेनुसार सामाजिक घटनात्मक व संदर्भनिहाय आरक्षण राहील. अपेक्षित संवर्गातील व शाखेतील अर्ज न आल्यास इतर संवर्ग व शाखातून जागा भरल्या जातील. अर्ज विक्री दि. ३.६.२०२४ ते १७.६.२०२४ तसेच स्विकृती दि. ३.६.२०२४ ते १८.६.२०२४ या कार्यालयीन वेळेत १०.३० ते ५.३० पर्यंत राहील. प्रवेश अर्जाची किंमत खुला गट २०० रु. व मागास वर्गियांसाठी १००रु. याप्रमाणे असेल. तसेच मराठी माध्यमाची शैक्षणिक शुल्क १५००० रु. व इंग्रजी माध्यमाचे १५००० रु. असेल.

संपर्क
प्राचार्या
श्रीम. मधाळे कुसूम परिसा
श्री. डी.डी. विसपुते अध्यापक विद्यालय प्लॉट नं. ४१, सेक्टर - १५ रेल्वे स्टेशनजवळ, नविन पनवेल, जि. रायगड
फोन नं. - ९८२१७०४३५० / ८८२८४८२१६७ / ०२२२७४६२८८६ / ९०८२५२८५६८ / ९९६०९३८०६१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की.

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून विकसनाकरीता घेणेचे निश्चित केलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालक श्री. गजानन दत्तात्रेय नार्वेकर यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, पेण नगरपरिषद हद्दीमधील मौजे पेण ग्रामीण :-

भूमापन क्रमांक, हिस्सा क्रमांक	क्षेत्र आर. चौ. मिटर	आकार रू. पैसे
५०२/४	५-००-००	३२०.००

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकसनाला घेणेचा व्यवहार विकसन करारनामा करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०१/०६/२०२४

ॲड. रविंद्र वि. ओक
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

PUBLIC NOTICE

This notice is given to the public at large that my clients 1) Mrs Usha Raj Tejuja, 2) Mr. Rishi Raj Tejuja and Mr. Hem Raj Tejuja residing at Flat No. B/201 floor No. 23rd Lodha, marquise Pandurang Budhkar Marg, Lower Parel, Mumbai, PO Dellsle Road, Mumbai, No. 400013 Maharashtra, (Mob. NO. 91+9999195000) are the legal heirs of one Mr. Raj Mohanlal Tejuja. Said Raj Mohanlal Tejuja is now no more and he has left the only legal heirs as above. The said Raj Mohanlal Tejuja is owner and in possession of the following description landed property.

Description of landed property.

Village	S.NO. /H.NO.	Gut No.	Area HR	Assesement Rs. Ps.
Kamath, Tal. Alibag Dist. Raigad.	---	105/1	0-06-40	00-34

The said Raj Mohanlal Tejuja was owner and in possession of the above mentoned landed property till his death. After his death, now my clients being his legal heirs are owners and in possession of the said landed property mentioned above.

My clients therefore, called upon the public at large that except them, no any other person is concerned with the said landed property. However, any person having any right, title and interest in the above said property, shall approach the undersigned Advocate or my clients as above having Mobile No.91+9999195000 and having e mail address rtej@sheercap.com within seven days with documentary proof. Thereafter the claim of any such person claiming any right, title and interest in the said property shall not be enteretained and my clients as above will be exclusive owner and in possession of the said landed property.

Alibag
Dated 31-05-2024

(Vijay A. Pedhavi)
Advocate Alibag.

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

कॅनरा बँक उरण मोरा शाखा, पत्ता : उरण मोरा

शाखेचा संदर्भ क्र. : ५२११/७७३/१२८,
दि. २९.०५.२०२४

ताबा सूचना

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा ५४/२००२) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३(१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार श्री. गणेश सुधाकर घरत, घर क्र. ३५४, गावठाण, गाव क्षेत्र, नवीन शेवा, तालुका उरण, जि. रायगड पिन - ४०० ७०२ यांना सूचनेत निर्देशित रक्कम रु. १२,३७,९३९.५७ (रु. बारा लाख सदतीस हजार नऊशे एकोणचाळीस व सत्तावन्न पैसे मात्र) अधिक लागू न केलेले व्याज व प्रभार रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या प्राप्तीपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. ०२.०३.२०२४ (०२ मार्च, २०२४) जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ व ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. २९ मे, २०२४ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदारांना व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये व मालमत्तेसंदर्भातील कोणताही व्यवहार हा कॅनरा बँक, उरण मोरा शाखा यांच्या प्रभारांतर्गत रक्कम रु. १२,३७,९३९.५७ (रु. बारा लाख सदतीस हजार नऊशे एकोणचाळीस व सत्तावन्न पैसे मात्र) अधिक त्यावरील व्याज रकमेच्या अधीन असेल.

स्थावर मालमत्तेचे विवरण

घर क्र. ३५४, गावठाण क्षेत्र, गाव न्हावा शेवा, ग्रामपंचायत नवीन शेवा यांच्या कार्यकक्षेतील, तालुका उरण, जि. रायगड.
उत्तरेस : सुधाकर घरत यांची मालमत्ता,
दक्षिणेस : मोकळा भूखंड,
पूर्वेस : निवासी घर,
पश्चिमेस : अंतर्गत रस्ता.

दिनांक : २९.०५.२०२४
ठिकाण : उरण

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

निवडक

‘मी भारताकडून खेळणारच’

नवी दिल्ली : रियान परागसाठी आयपीएल २०२४ चा हंगाम खूप खास राहिला. या हंगामात त्याने सातत्याने चमकदार कामगिरी करून सर्वांना प्रभावित केले. विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडनंतर तो सर्वाधिक धावा करणारा तिसरा फलंदाज ठरला. ऑरेंज कॅपच्या शर्यतीत तिसऱ्या स्थानी राहिलेल्या रियानने भारताच्या संघात संधी मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे. रियान पराग म्हणाला की, मी भारतीय संघाकडून लवकरच खेळेन.काहीही झाले तरी हे होणारच आहे, असा मला विश्वास आहे.

आझमला दिसले तारे

ओव्हल : विश्वचषकापूर्वी पाकिस्तान संघ इंग्लंडविरुद्ध चार सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेतील चौथा सामना गुरुवारी खेळवण्यात आला. ओव्हल मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात इंग्लंडचा भेदक गोलंदाज मार्क वूडने पाकिस्तानचा फलंदाज आझम खानला बाऊन्सरवर विचित्र पध्दतीने बाद केले. मार्क वुडने त्याच्या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर भयंकर बाऊन्सर टाकला. या चेंडूवर आझम खानने डोळे बंद करत बॅट वर करतो पण तो यष्टीरक्षकाकडून झेलबाद झाला.

संदीपचे स्वप्न भंगले

नवी दिल्ली : नेपाळ क्रिकेट संघाचा माजी कर्णधार संदीप लामिछानेचे टी २० विश्वचषकात खेळण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहणार आहे. अमेरिकेने संदीपला दुसऱ्यांदा व्हिसा देण्यास नकार दिला आहे. आता न्यायालयाने संदीपला बलात्कार प्रकरणात क्लीन चिट दिली आहे. पण तरीही त्याला विश्वचषकासाठी अमेरिकेचा व्हिसा मिळाला नाही. तत्पूर्वी संदीपविरोधात ऑक्टोबर २०२२ मध्ये एका मुलीने काठमांडू येथे ऑगस्टमध्ये तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप केल्यानंतर अटक केली होती.

जोकोविचही तिसऱ्या फेरीत

पॅरिस : अग्रमानांकित सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचने आपली विजयी लय कायम राखताना फ्रेंच स्पर्धेची तिसरी फेरी गाठली. त्याने पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत स्पेनच्या रोबेर्टो कारबालेस बाएनाला ६-४, ६-१, ६-२ अशा फरकाने पराभूत केले. सामन्यातील पहिल्या सेटमध्ये बाएनाने जोकोविचसमोर बाएनाने आव्हान उपस्थित केले. मात्र, या सेटमधील विजयानंतर जोकोविचने अधिकच खेळ उंचावत बाएनावर सहज मात केली. जोकोविचच्या विजयामुळे फ्रेंच टेनिस स्पर्धेत रंगत वाढली आहे.

टीम इंडिया नाखूश

अमेरिका : भारतीय संघ टी २० वर्ल्डकप २०२४ खेळण्यासाठी न्यूयॉर्कमध्ये दाखल झाला असून तेथे त्यांनी सराव देखील करण्यास सुरूवात केली आहे. भारताचा सराव सामना हा बांगलादेशसोबत १ जून रोजी न्यूयॉर्कच्या नासाऊ काऊन्टी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. मात्र आयसीसीने भारतीय संघाला उपलब्ध करून दिलेल्या सुविधांवर टीम इंडिया नाराज आहे. सरावाच्या सोयी या सुमार दर्जाच्या असल्याचं टीम इंडियाचं म्हणणं असल्याचे वृत्त येत आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मालिकांसाठी

महिला संघाची घोषणा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकांसाठी भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. दक्षिण आफ्रिका महिला संघ जून २०२४ मध्ये भारतीय दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यात दोन्ही महिला संघात वनडे, टी आणि कसोटी मालिका खेळवण्यात येणार आहे. या दौऱ्यासाठी भारतीय संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर आणि उपकर्णधारपद स्मृती मानधनाकडे आहे. तसेच तिन्ही क्रिकेट मालिकांसाठी जेमिमाह रोड्रिग्स आणि पुजा वस्त्राकर यांचा समावेश करण्यात आला आहे,

दरम्यान, बांगलादेशविरुद्धच्या टी२० मालिकेदरम्यान दुखातपतग्रस्त झालेल्या यास्तिका भाटीयाच्या जागेवर यष्टीरक्षक फलंदाज उमा छेत्रीला संधी देण्यात आली आहे. त्यामुळे तिला आता आंतरराष्ट्रीय पदार्णाची संधी असणार आहे. त्याचबरोबर प्रिया पुनिया आणि अरुंधती रेड्डी यांचे संघाच पुनरागमन झाले आहे.दक्षिण आफ्रिकेचा हा भारत दौरा १३ जून पासून सुरुवात होणार असून ९ जुलै रोजी संपणार आहे. १३ जूनला दक्षिण आफ्रिका सराव सामना खेळेल, त्यानंतर १६ ते २३ जून दरम्यान तीन सामन्यांची वनडे मालिका होईल, तर २८ जून ते १ जुलै दरम्यान एकमेव कसोटी सामना होईल, तर ६ ते ९ जुलै दरम्यान टी मालिका खेळवली जाईल.

वनडे मालिकेसाठी संघ -

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स , ऋचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री (यष्टीरक्षक), दयालन हेमलथा, राधा यादव, आशा शोभना, श्रेयंका पाटील, सायका इशाक, पूजा वस्त्रकार, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, प्रिया पुनिया.

कसोटी सामन्यासाठी संघ-

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, शुभा सतीश, जेमिमाह रॉड्रिग्स , ऋचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री (यष्टीरक्षक), दीप्ती शर्मा, स्नेह राणा, सायका इशाक, राजेश्वरी गायकवाड, पूजा वस्त्राकर , अरुंधती रेड्डी, रेणुका सिंग ठाकूर, मेघना सिंग, प्रिया पुनिया.

टी २० मालिकेसाठी संघ - हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, दयालन हेमलता, उमा छेत्री (यष्टीरक्षक), ऋचा घोष (यष्टीरक्षक), जेमिमाह रॉड्रिग्स , सजना सजीवन, दीप्ती शर्मा, श्रेयंका पाटील, राधा यादव, अमनजोत कौर, आशा शोभना, पूजा वस्त्राकर, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी राखीव खेळाडू - सायका इशाक.

दक्षिण आफ्रिका महिला संघाचा भारत दौरा

वनडे मालिका –१६ जून – पहिला वनडे सामना, बेंगळुरू (वेळ – दु. १.३० वाजता)१९ जून – दुसरा वनडे सामना, बेंगळुरू (वेळ – दु. १.३० वाजता) २३ जून – तिसरा वनडे सामना, बेंगळुरू (वेळ – दु. १.३० वाजता) कसोटी सामना –२८ जून ते १ जुलै –चेन्नई (वेळ – स. ९.३० वाजता)

टी २० मालिका जुलै – पहिला टी सामना, चेन्नई (वेळ – संध्या. ७.०० वाजता)

७ जुलै – दुसरा टी सामना, चेन्नई (वेळ – संध्या. ७.०० वाजता)९ जुलै – तिसरा टी सामना, चेन्नई (वेळ – संध्या. ७.०० वाजता).

उच्च शिक्षणातील योग्य शाखांची निवड करा

माजी आमदार पंडित पाटील यांचे मार्गदर्शन

। पेझारी । वार्ताहर ।

आंतरराष्ट्रीय विमानतळ नवी मुंबईचे पनवेल येथे काम सुरू आहे. ते पूर्ण झाल्यानंतर तेथे लागणारे मनुष्यबळ, उपलब्ध नोकरीच्या संधी, उपलब्ध होणारे व्यवसाय, उद्योग यांचा अभ्यास करून दहावी बारावीनंतर उच्च शिक्षण घेताना योग्य त्या शाखांची निवड करा, असे मोलाचे मार्गदर्शन माजी आमदार पंडित पाटील यांनी नुकत्याच मार्च २०२४ मधील दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात केले.

यामध्ये बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून गेना धनराज लक्ष्मण ९२.३३ टक्के गुण मिळवून शाखेत व कनिष्ठ महाविद्यालयात सर्वप्रथम, मोहंमद वसिफ सखरेआलम ८९.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर टेमकर पूर्वा अनुरुद्र ८२.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.

वाणिज्य शाखेचा निकाल ही १०० टक्के लागून जोशी सानिका मनोविजय ७२.८३ टक्के प्रथम,

पाटील सानिका प्रवीण ६८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर देवासी अंजू उकाराम ६६.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.

कला शाखेचा निकाल ९२.६८ टक्के लागला असून जुईकर ओम दीपक ६६.३३ टक्के गुण मिळवून प्रथम, चवरकर स्नेहा महेश ६५.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर पाटील यज्ञेश अनिल ६०.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

किमान कौशल्य विभागाचा निकाल ८३ टक्के लागला असून पाटील नितेश विजय ६१.८३ टक्के गुण मिळवून प्रथम, पाटील श्रेयश रमेश ५६.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर पाटील ओंकार नंदकुमार ५५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

इयत्ता दहावीचा निकाल ९८.६७ क्के लागला असून म्हात्रे जिया प्रीतम व पाटील सावरी महेश या दोन विद्यार्थिनी ९३.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या आहेत. द्वितीय क्रमांक पाटील सृष्टी सागर ९२.२० टक्के तर गोंधळी सई जगदीश ९०.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सुशीला सदन येथे माजी आमदार पंडित पाटील, माजी रा. जि. प. सदस्या भावना पाटील, अलिबाग पंचायत समिती माजी सभापती प्रमोद ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांना पितृशोक

खोपोली: आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांचे वडील ज्येष्ठ समाजसेवक वामनराव कदम यांचे वयाच्या ९२ वर्षी वृद्धापकाळाने गुरूवारी (दि.३०) निधन झाले. वामनराव कदम यांनी गेली ५० वर्ष सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा क्षेत्रात जनतेची सेवा निस्पृह आणी निःस्वार्थीपणे केली आहे. जनतेमध्ये त्यांना भाऊसाहेब नावाने संबोधले जायचे. कै. माजी मंत्री बी.येल. पाटील. शेकापचे माजी आमदार कै. मोहन पाटील आणि कै. प्रभाकर पाटील व ज्येष्ठ कायदे तज्ज्ञ दत्ता पाटील यांच्या समवेत जिल्ह्यात जनतेची सेवा केली. त्यांच्या अंत्यविधीकरिता सर्व समाज बांधव, सामाजिक कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५(Jsw duty) ९२७०५६०४५६
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१
- अंकुर नर्सरी, वाडगाव फाटा, अलिबाग सिझनल सेल! सर्व प्रकारच्या फळझाडे आणि फूलझाडे वर भरपूर डिस्काऊंट. १५ जूनपर्यंत झाडे बुक केल्यास अधिक डिस्काऊंट. संपर्क : ९४२३८९०२९५ (शुक्रवार ते सोमवार)
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- Shop near alibag ST Stand is for sale 9764548679
- Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697
- अगस्त्या फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबागमधील शाखेत Instructor या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता पदवीधर (BSC/MSC/B.ed/D.ed/Be) निवड प्रक्रिया- लेखी परिक्षा व मुलाखत. इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२/प्रकाश हांडे- ९४२३०१६९३२
- B.A, B.ed, D.ed. B.sc. BP.ed शिक्षक/शिक्षिका पाहिजेत. पगार अनुभवानुसार आपला बायोडाटा ८३९०९०९४७० या नंबरवर व्हॉट्सअप करा. तसेच अलिबागसाठी ऑफिससाठी अकौंटस क्लार्क पाहिजेत.
- अलिबाग एस.टी. स्टँडसमोर रेडी क्लासरूम इन्फ्रास्ट्रक्चर हॉबी क्लासेस, स्कील डेव्हलपमेंट व इतर कोणत्याही शैक्षणिक वापरासाठी उपलब्ध आहे. संपर्क : ८३९०९०९४७०
- पहिली ते पाचवी क्लासेस व पाळणाघर श्रीबाग नं.-२, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ९८२३९२०४०३, ८१४९६६९२४६
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी ३५० स्क्वे.फूट. गाळा भाड्याने देणे आहे. (बीच रोड, जुना नगरपालिकेजवळ, संपर्क - ९४२११६३१२४
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे.पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क- ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कळसुबाई शिखरावर तिरंगा फडकवून वाढदिवस साजरा

। रसायनी । वार्ताहर ।

गिर्यारोहकांच्या साहसाला आव्हान देणारे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर ५४०० फूट इतकी उंची असलेल्या कळसुबाई शिखरावर चढाई करून गिर्यारोहक रोहिदास राघो ठोंबरे, रोशन पांडुरंग ठोंबरे, गौरव ठोंबरे, कराड गावाचे आकाश गोडिवले व प्रसाद जाधव यांनी साडेतीन तासांच्या खडतर प्रवासानंतर शिखर सर केले.

गिर्यारोहक रोहिदास ठोंबरे हा तरूण मुळचा रायगडचा असून नोकरीनिमित्ताने चौकमध्ये स्थायिक आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनात गिर्यारोहणाची आवड जोपासली असून, श्री छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन भैरवगड, अलंग, मदन कुलंग, ढाकबहिरी यासारखे अवघड किल्ले यापूर्वी सर केले आहेत. रोहिदास ठोंबरे प्रत्येक गडकिल्ल्यावर जाऊन अभ्यास करत असतात. आतापर्यंत त्यांनी शंभरहून अधिक किल्ल्यांवर जाऊन अभ्यास केला आहे.

रोहिदास ठोंबरे हे खालापूर तालुक्यातील चौक आसरोटी गावचे असून शिक्षक म्हणून नवी मुंबई येथील श्री स्वामीनारायण गुरुकुल येथे कार्यरत आहेत. याशिवाय ते शिवव्याख्याते असून सामाजिक कामात नेहमी अग्रेसर असतात. त्यांना गड किल्ले संवर्धन व सामाजिक कार्याची आवड आहे. कळसुबाई चढण्याचा अनुभव थरारक होता. रात्री दोन वाजता चढाईला सुरुवात करून पहाटे साडेपाचला त्यांनी कळसुबाई शिखर सर केले. महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर सर केले म्हणून थेट आपल्या जन्मदिनाच्या निमित्ताने कळसुबाई शिखरावर भारतीय तिरंगा फडकवून आपला आनंद साजरा केला.या मोहिमेत त्यांच्यासोबत त्यांचे दुर्गमित्र यांनी भगवी शाल देऊन त्यांचा गौरव केला.

पाकिस्तानच्या पराभवाची मालिका कायम

लंडन : देश असो की मग विदेश पाकिस्तानच्या पराभवाची मालिका कायम आहे. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तानी संघाला ट्वेंटी-२० विश्वचषकाच्या तोंडावर ०-२ असा दारूण पराभव पत्करावा लागला.

पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात चार सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळवली गेली. पहिला सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर यजमान इंग्लंडने दुसरा सामना जिंकला. मग तिसरा सामन्यात देखील पावसाची बॅटिंग पाहायला मिळाली. पण, चौथ्या सामन्यात विजय मिळवून यजमानांनी आपला दबदबा कायम ठेवला. गुरुवारी झालेल्या निर्णायक सामन्यात इंग्लिश संघाने ७ गडी आणि २७ चेंडू राखून मोठा विजय मिळवला. खरे तर इंग्लंडविरूद्धच्या मालिकेत शेजाऱ्यांनी त्यांचा विश्वचषकाचा संघ उतरवला होता. यष्टीरक्षक म्हणून आझम खानला संधी मिळाली होती, पण त्याच्या खराब क्षेत्ररक्षणाचा पाकिस्तानला चांगलाच फटका बसला.

ट्रीसा-गायत्रीचा दिग्गजांना धक्का; सिंधू, प्रणोयचा पराभव

। सिंगापूर । वृत्तसंस्था ।

ट्रीसा जॉली- गायत्री गोपीचंद या भारताच्या महिला जोडीने गुरुवारी सिंगापूर ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सनसनाटी विजयाची नोंद केली. ट्रीसा-गायत्री जोडीने महिला दुहेरी विभागातील लढतीत बेक हा ना- ली सो ही या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या दक्षिण कोरियन जोडीला पराभवाचा धक्का देत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

दुहेरीत भारताला यश मिळाले असले तरी एकेरीत निराशेला सामोरे जावे लागले आहे. पी. व्ही. सिंधू हिचे महिला एकेरीतील, तर एच. एस. प्रणोय याचे पुरुष एकेरीतील आव्हान संपुष्टात आले. ट्रीसा जॉली - गायत्री गोपीचंद ही

भारतीय जोडी जागतिक क्रमवारीत ३०व्या स्थानावर आहे. याआधी दक्षिण कोरियन जोडीकडून दोन वेळा भारतीय जोडीला पराभवाचा सामना करावा लागला होता.

ट्रीसा - गायत्री जोडीला त्यांच्याविरुद्ध हा पहिलाच विजय ठरला. बेक हा ना - ली सो ही या जोडीकडून पहिल्या गेममध्ये चुका झाल्या. याचा फायदा भारतीय जोडीने घेतला. १८-९ अशी आघाडी घेत पहिला गेम २१-९ असे जिंकण्यात त्यांना यश मिळाले.

दुसऱ्या गेममध्ये ट्रीसा जॉली - गायत्री गोपीचंद जोडीकडून चूक घडली. त्यामुळे दक्षिण कोरियन जोडीला या लढतीत पुनरागमन करता आले. बेक हा ना - ली सो ही या जोडीने हा गेम २१-१४ असा जिंकत १-१ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या गेममध्ये दोन्ही जोड्यांमध्ये ८-८ अशी बरोबरी झाली. ही लढत अटीतटीची होणार, असे वाटू लागले; पण ब्रेकआधी भारतीय जोडीने दोन महत्त्वाचे गुण मिळवले आणि सामन्याला कलाटणी देण्याचा प्रयत्न केला. भारतीय जोडीने आक्रमक खेळ करताना १६-९ अशी आघाडी मिळवली. अखेर तिसरा गेम २१-१५ असा जिंकण्यात त्यांनी बाजी मारली.

अल्टिमेट टेबल टेनिस नव्या रुपात

२२ ऑगस्टपासून सुरू होणार पर्व; ८ संघ जेतेपदासाठी भिडणार

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

भारताची प्रमुख टेबल टेनिस लीग, अल्टिमेट टेबल टेनिस २२ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत चेन्नईतील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. अव्वल दर्जाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आकर्षित करण्यारी आणि भारतीय पॅडलर्सच्या जलद प्रगतीच्या क्षमतेसाठी ओळखली जाणारी ही लीग आणखी एका रोमांचक नवीन हंगामासाठी सज्ज झाली आहे.

भारतीय टेबल टेनिस फेडरेशनच्या विद्यमाने निरज बजाज आणि विटा दाणी यांनी प्रोत्साहन दिलेली फ्रँचायझी लीग २०१७ मध्ये स्थापन झाल्यापासून भारतीय टेबल टेनिससाठी एक गेमचेंजर ठरली

आहे. सारख्या उपक्रमांची भरभराट होईल आणि भारताच्या टेबल टेनिस इकोसिस्टममध्ये योगदान मिळेल याची खात्री करून संपूर्ण देशभरात या खेळाला प्रगत करण्यासाठी ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. प्रथमच या लीगमध्ये आठ संघांचा समावेश असणार आहे, जी युवा भारतीय पॅडलर्सना जगातील अव्वल खेळाडूंसोबत त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करेल.

लीगच्या २०२४ आवृत्तीसह सुरू होणारा हा एक आनंददायक नवीन टप्पा आहे.गोवा चॅलेंजर्सने मागील वर्षी माजी विजेत्या चेन्नई लायन्सवर विजय मिळवला आणि २०२४ साठी गतविजेते म्हणून लीगमध्ये प्रवेश केला. दबंग दिल्ली टीटीसी, यू मुंबा टीटी, पुणेरी पलटण, बंगळुरू स्मॅशर्स आणि दोन नवीन फ्रँचायझी यांचा यंदाच्या पर्वात समावेश आहे. प्रत्येक संघ दोन परदेशी खेळाडूंसह सहा खेळाडूंचा रोस्टर राखेल, कारण ते सर्व या हंगामात प्रतिष्ठित विजेतेपदासाठी लढत आहेत.आठ संघांच्या समावेशासह स्वरूपामध्ये थोडासा बदल करण्यात आला आहे, जे आता प्रत्येकी चार संघांच्या दोन गटांमध्ये विभागले जातील.

फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा

श्वीऑटेकचा संघर्षपूर्ण विजय

। पॅरिस। वृत्तसंस्था ।

इगा श्वीऑटेकने जपानच्या नाओमी ओसाकावर संघर्षपूर्ण विजय मिळवताना फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेची तिसरी फेरी गाठली. महिलांमध्ये दुसऱ्या मानांकित अरिना सबालेन्का आणि कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने, तर पुरुषांमध्ये इटलीचा यानिक सिन्नेर आणि पाचवा मानांकित डॅनिल मेदवेदेव यांनीही तिसऱ्या फेरीतील स्थान निश्चित केले.

जेतेपदासाठी प्रमुख दावेदार असणाऱ्या पोलंडच्या श्वीऑटेकने माजी ग्रँडस्लॅम विजेत्या ओसाकावर ७-६ (७-१), १-६, ७-५ असा विजय मिळवला. सामन्यातील पहिला सेट श्वीऑटेकने जिंकला, पण तिला संघर्ष करावा लागला. दुसऱ्या सेटमध्ये ओसाकाने सहज बाजी मारत सामना बरोबरीत आणला. तिसऱ्या सेटमध्येही ओसाकाने वर्चस्व मिळवले होते. तिच्याकडे ५-२ अशी मोठी आघाडी होती. मात्र, यावेळी श्वीऑटेकने सलग पाच गेम जिंकत सामना आपल्या नावे केला. सबालेन्काने जपानच्या मोयुका उचिजिमाला ६-२, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवत आगेकूच केली. माजी विम्बल्डन विजेत्या रायबाकिनाने नेदरलँड्सच्या अरांतक्सा रसला ६-३, ६-३ असे सरळ सेटमध्ये नमवत तिसऱ्या फेरीत धडक मारली. पुरुष एकेरीत सिन्नेरने फ्रान्सच्या रिचर्ड गॅस्केवर ६-४, ६-२, ६-४ असा विजय मिळवला. मेदवेदेवला मिओमिर केचमानोविचविरुद्ध पुढे चाल मिळाली. मेदवेदेव आघाडीवर असताना मिओमिरने सामना मध्येच सोडला. ॲलेक्झांडर इवेरेवने डेव्हिड गॉफिनवर ७-६ (७-४), ६-२, ६-२ असा विजय साकारला.

ऑस्ट्रेलियाला पराभवाचा दणका

■ पूरनची ३०० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी

। वेस्ट इंडिज । वृत्तसंस्था ।

आगामी टी २० विश्वचषकासाठी सध्या सराव सामने खेळवले जात आहेत. ऑस्ट्रेलियाचा दुसरा सराव सामना यजमान वेस्ट इंडिजविरुद्ध शुक्रवारी (दि.३१) झाला. या सामन्यात वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियाला ३५ धावांनी पराभवचा धक्का दिला आहे.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी चांगलीच फटकेबाजी केली. वेस्ट इंडिजकडून यष्टीरक्षक फलंदाज निकोलस पूरनने २५ चेंडूत ३०० च्या स्ट्राईक रेटने ७५ धावांची खेळी केली, तर कर्णधार रोवमन पॉवेलने २५ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. तसेच शेर्फेन रुदरफोर्डने १८ चेंडूत ४७ धावा केल्या. त्यामुळे वेस्ट इंडिजने २० षटकात ४ बाद २५७ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून ॲडम झम्पाने २ बळी घेतले. तर टीम डेव्हिड आणि ॲश्टन एगर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाला २२२ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून जोश इंग्लिशने सर्वाधिक ५५ धावांची खेळी केली. तसेच नॅथन एलिसने २२ चेंडूत ३९ धावांची खेळी केली. मात्र त्याला संघाला विजय मिळवून देता आला नाही.

कसे काम करतात सेन्सर्स?

खास बात

आपला स्मार्टफोन अनेक कामं करतो. त्यात असं काय असतं ज्यामुळे फोनमधली ॲप्स चालतात असे प्रश्न तुम्हाला पडत असतील ना? स्मार्टफोनमध्ये असलेल्या सेन्सर्समुळे आपला स्मार्टफोन अगदी मस्त काम करतो. तुम्ही स्मार्टफोनमध्ये कंपास नावाचं ॲप डाउनलोड केलं तर त्यामुळे फोन दिशा दाखवायला लागतो. ही सगळी फोनमधल्या सेन्सर्सची कमाल असते. म्हणून मित्रांनो, स्मार्टफोनमधील सेन्सर्सची माहिती घेऊ.

✻ प्रॉक्सिमिटी हा सेन्सर स्मार्टफोनमधल्या सेल्फी कॅमेऱ्याजवळ बसवलेला असतो. स्मार्टफोनच्या जवळ असलेल्या वस्तूची जाणीव या सेंसरमुळे होते.



फोन आल्यानंतर किंवा बोलण्यासाठी फोन कानाला लावल्यानंतर या सेन्सरमुळे स्मार्टफोनचा डिस्प्ले लाईट आपोआप बंद होतो.

✻ ॲक्सिलरोमीटर आणि गिरोस्कोप हे सेन्सर मोबाईल कोणत्या दिशेला आहे याचा शोध घेतात. फोनमधला व्हिडिओ किंवा फोटो फोनच्या दिशेनुसार फिरतो. या दोन सेन्सर्समुळे असं होतं. फोनमधलं ऑटो रोटेशन एनेबल केल्यानंतरच हे सेन्सर काम करतात. आरोग्याशी संबंधित ॲप्समध्येही ॲक्सिलरोमीटर सेन्सरचा वापर केला जातो.

✻ मॅग्नेटोमीटर हा सेन्सर पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीप्रमाणे काम करतो. या सेन्सरमुळे फोनमध्ये इन्स्टॉल केलेला डिजिटल कंपास योग्य दिशा दाखवू शकतो. ॲंबियंट लाईट या सेन्सरमुळे स्मार्टफोनच्या स्क्रीनचा प्रकाश खोलीतल्या प्रकाशानुसार कमी-जास्त होतो.

✻ व्हर्च्युअल रिॲलिटी हा सेन्सरही फोनमध्ये असतो. स्मार्टफोनमधले सगळे सेन्सर्स स्मार्टफोनचा सीपीयू आणि जीपीयूच्या मदतीने अचूक माहिती गोळा करतात. व्हर्च्युअल रिॲलिटी सेन्सर स्मार्टफोनच्या कॅमेऱ्यासोबत काम करतो.

✻ जीपीएस सेन्सर सर्वच स्मार्टफोनमध्ये बसवलेला असतो. या सेन्सरमुळे स्मार्टफोनचं लोकेशन कळतं. विविध प्रकारचे कृत्रिम उपग्रह या सेन्सर्सशी जोडले जाऊन लोकेशनची माहिती देतात.

जगातील सर्वात मोठा हिमखंड!

माहीत आहे?

जगातील सर्वात मोठ्या हिमखंड अशी ओळख असलेला A23a हिमखंड तुटला असून तो दक्षिण महासागराकडे सरकलाय. जगातील सर्वात मोठा हिमखंड घसरत असल्याचे ३० वर्षांनंतर घडते आहे. हा अंटार्क्टिक हिमखंड सुमारे ४,००० चौरस किमी (१,५०० चौरस मैल) मध्ये पसरलेला आहे. १९८६ मध्ये पश्चिम अंटार्क्टिकापासून फिल्चनर-रोन आइस शेल्फपासून दूर गेल्यानंतर कोणतेही हिमखंड तुटले नाहीत. हे हिमखंड वेडेल समुद्राच्या तळाशी अडकले. अलीकडील उपग्रहांच्या फोटोनुसार सुमारे एक ट्रिलियन मेट्रिक टन वजनाचा हा हिमखंड आता जोरदार वारा आणि प्रवाहांच्या मदतीनं अंटार्क्टिक द्वीपकल्पाच्या उत्तरेकडील टोकाकडे वेगानं सरकत आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या वेडेल क्षेत्रातील हिमखंड, अंटार्क्टिक सर्कंपोलर करंट ओलांडून, दक्षिण अटलांटिकच्या दिशेने जाणाऱ्या आइसबर्ग ॲली मार्गात मध्ये प्रवेश करतात. शास्त्रज्ञांच्या मते या आकाराचा हिमखंड दिसणं दुर्मिळ आहे. त्याला वाफ मिळताच, हा प्रचंड खडक अंटार्क्टिक सर्कंपोलर करंटमध्ये सोडला जाईल. हिमखंड पर्यावरणात महत्त्वाची भूमिका बजावतात. हे हिमखंड अनेक प्रकारे जीवन देणारे आहेत. हिमखंड वितळल्यावर ते खनिज धूळ सोडतात, जी सागरी अन्न साखळीच्या पायथ्याशी असलेल्या जीवांसाठी पोषक तत्वांचा स्रोत म्हणून काम करते. तथापि, सर्व हिमखंड कालांतरानं वितळणं आणि विघटित होणं बंधनकारक आहे. दरम्यान, नुकतेच ग्रीनलँडमध्ये हिमनदीचा मोठा भाग तुटल्याने शास्त्रज्ञांची चिंता वाढली आहे. ही हिमनदी ८० किलोमीटर लांब आणि २० किलोमीटर रुंद असलेल्या ग्रीनलँडमध्ये बर्फाच्या पर्वताचा भाग आहे. शास्त्रज्ञांनी याला बदलत्या हवामानाचा पुरावा असल्याचं म्हटलं आहे.

मध्यरात्रीच्या सूर्याची भूमी: नॉर्वे

सफर देशांची

नॉर्वे हा छोटासा देश युरोपच्या उत्तर भागात वसला आहे. ओस्लो ही या देशाची राजधानी. निसर्गसौंदर्य हे या देशाचं वैशिष्ट्य. हा पर्वतरांगांनी वेढलेला देश आहे. नॉर्वेला लांबलचक समुद्रकिनाराही आहे. उत्तर समुद्रापासून आर्टिक वर्तुळापर्यंत हा समुद्रकिनारा पसरला आहे. नॉर्वेला 'मध्यरात्रीच्या सूर्याची भूमी' असं म्हटलं जातं. उन्हाळ्यात नॉर्वेच्या अतिउत्तरेकडच्या भागांमध्ये सूर्य जवळपास मावळतच नाही. या भागात तुम्ही रात्रभर गोल्फ खेळू शकता. उन्हाळ्यात इथे खूपच वेगळं वाटतं. वर्षातले २४० दिवस या भागात पाऊस पडत असतो. हा देश युरोपमधल्या स्कँडेनेव्हिया भागात येतो. स्वीडन, फिनलँड आणि रशिया हे नॉर्वेचे शेजारी. हा देश आकाराने फार मोठा नसला तरी लांबुळका आहे. 'एफजॉर्डस' हे इथलं अजून एक वैशिष्ट्य आहे. नॉर्वेत झाडंही भरपूर आहेत. उन्हाळ्यात नॉर्वेमध्ये जवळपास २४ तास सूर्यप्रकाश असतो तर हिवाळ्यात इथे खूप थंडी असते. इथे उन्हाळा कमी तर हिवाळा जास्त काळ असतो. हिवाळ्यात इथे खूप अंधार असतो. नॉर्वेच्या बऱ्याच भागांमध्ये हिवाळ्यात अनेक महिने सूर्याचं दर्शनच होत नाही. नॉर्वे पृथ्वीच्या अतिउत्तरेकडे असल्याने पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीमुळे इथे बरेच चमत्कार पहायला मिळतात. प्रकाशाचा अनोखा खेळ इथे पहायला मिळतो. निसर्गाच्या या चमत्काराला नॉर्दन लाईट्स किंवा अरोरा असं म्हटलं जातं. इथे सुमारे ३०० वर्षं डेन्मार्कचं राज्य होतं. त्यानंतर स्वीडनने नॉर्वेचा ताबा घेतला. १९०५ मध्ये या देशाला स्वातंत्र्य मिळालं. नॉर्वे हा जगातल्या श्रीमंत देशांपैकी एक आहे. इथे मोठ्या प्रमाणात तेल सापडतं. यामुळे नॉर्वेला भरपूर उत्पन्न मिळतं.

मुलांनो, वाचन करा!

स्टडी टिप्स

स्मार्टफोन, कॉम्प्युटरच्या नादात वाचनाचं प्रमाण कमी होत आहे. पण मित्रमैत्रिणींनो, तुम्ही वाचायला हवं. वाचनाचे बरेच फायदे आहेत. वेगवेगळ्या विषयांची पुस्तकं वाचल्याने तुम्हाला अभ्यासातही लाभ होऊ शकतो. वाचनाचे फायदे जाणून घेऊया.

✻ वाचनामुळे शब्दसंपत्ती वाढते. याचा फायदा बोलताना आणि लिहिताना होईल. पेपर लिहिताना तुम्ही अधिक अचूक शब्द वापरू शकता. वेगवेगळे प्रोजेक्ट्स करतानाही वाचनाचा उपयोग होतो.

✻ वाचनामुळे स्मरणशक्ती सुधारते. पुस्तकातली विविध पात्रं, घटना तुम्हाला लक्षात ठेवाव्या लागतात. सध्याच्या काळात आपण इंटरनेटवर सर्च करतो. यामुळे स्मरणशक्तीवर परिणाम होऊलागला आहे. वाचनामुळे जास्तीत जास्त माहिती डोक्यात साठवता येते.

✻ पुस्तक वाचताना तुम्ही वेगळा विचारही करता. यामुळे विचार करण्याची, विश्लेषण करण्याची क्षमताही सुधारते.

✻ वाचनामुळे तुम्ही जास्त लक्ष केंद्रित करू शकता. सोशल मिडिया आणि मल्टीटास्किंगमुळे आपल्यावर खूप ताण येतो. लहान मुलंही यातून सुटलेली नाहीत. पण पुस्तक वाचनाता तुम्ही संपूर्ण लक्ष त्यावर केंद्रित करता. यामुळे अभ्यासावरही तुम्ही जास्त चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करू शकता.

✻ वाचनामुळे तुम्ही चांगलं लिहू शकता. तुमचा निबंध इतरांपेक्षा चांगला होऊशकतो. तसंच उच्च शिक्षण घेताना वाचनाच्या सवयीचा तुम्हाला लाभ होऊ शकतो.

भन्नाट रिंगर

फन टाईम

रिंगर नावाचा एक खेळ आहे. अमेरिकेच्या मार्को कोर्टेझ यांनी २०१७ मध्ये हा नवा खेळ शोधून काढला. या खेळात फुटबॉलसारखाच एक बॉल असतो. पण या बॉलचा आकार थोडा लहान असतो. पण बेसबॉलसाठी वापरल्या जाणाऱ्या बॉलपेक्षा तो मोठा असतो. हा खेळ हातांनी खेळायचा असतो. बॉल जाळीत टाकणं हा या खेळाचा उद्देश. या खेळाची तीन सत्रांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. १५ मिनिटांचं एक सत्र असतं. या खेळात दोन संघ सहभागी होतात. प्रत्येक संघात ७ खेळाडू असतात. सर्व खेळाडू एकाच वेळी मैदानात हजर असतात. म्हणजे मैदानावर एकूण १४ खेळाडू असतात. फुटबॉलच्या खेळाप्रमाणे याचे नियम आहेत. या खेळात प्रत्येक टीमचा एक गोली असतो. गोलजाळीपासून साधारण २० यार्डाच्या अंतरावर गोलीझोन केलेला असतो. या झोनमध्ये गोली उभे असतात. गोली झोनमध्ये असेपर्यंत हे गोली बॉल अडवण्यासाठी संपूर्ण शरीराचा वापर करू शकतात. पण इतर स्थानांवर उभे असलेले खेळाडू फक्त हातांनीच चेंडू अडवू शकतात.

ठिपके जुळवा



ऑर्गेनिक केमिस्ट्रीतले बेस्ट पर्याय

कोण होणार?

विज्ञानाची आवड असणारी मुलं ऑर्गेनिक केमिस्ट्री या विषयात करीअर करू शकतात. कार्बन आणि त्याच्या घटकांचा अभ्यास ऑर्गेनिक केमिस्ट्रीमध्ये केला जातो. ऑर्गेनिक केमिस्ट्री घेऊन पदवी किंवा उच्च शिक्षण घेतल्यानंतर खाजगी तसंच सरकारी क्षेत्रांमध्ये नोकरीच्या अनेक संधी मिळतात. बारावीनंतर बीएससी इन केमिस्ट्री, एमएससी इन ऑर्गेनिक केमिस्ट्री हा अभ्यासक्रम करता येतो. या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी सिंथेटिक ऑर्गेनिक केमिस्ट्री, ऑर्गेनोएलिमेंट केमिस्ट्री, एंझाइम इंजिनिअरींग, मरीन केमिस्ट्री यासारखे विषय निवडू शकतात. ऑर्गेनिक केमिस्ट्रीमध्ये एमफिल किंवा पीएचडी करता येऊशकतं.

ऑर्गेनिक केमिस्ट्रीमध्ये पदवी किंवा उच्च शिक्षण घेतल्यानंतर पुढे संशोधन करता येईल. सीएसआयआर-नेट, आयआयसीटी तसंच एनसीएलसारख्या संस्थांमध्ये तुम्ही संशोधन करू शकता. तसंच सरकारी कंपन्यांमध्येही रिसर्च असोसिएट म्हणून काम करता येईल. आरोग्य, बायोकेमिकल, पर्यावरण या क्षेत्रात तुम्ही काम करू शकता.

नॅशनल फर्टिलायझर लिमिटेड, एचपीसीएल, बीपीसीएलसारख्या कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळू शकतात. ऑर्गेनिक केमिस्ट्री हा अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या अनेक संस्था देशात आहेत.

रंगवा हे चित्र



कॅमेरा डाव्या बाजूलाच का?

टेक्नो टॉक

सध्या प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असतो. आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक कामं मोबाईलच्या माध्यमातून केली जातात. नवा स्मार्टफोन घेताना आपण अनेक गोष्टींचा विचार करतो. म्हणजे मोबाईल कोणत्या कंपनीचा आहे, त्याची मेमरी किती आहे, त्याची बॅटरी लाईफ किती आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कॅमेरा किती मेगापिक्सल आहे. सेल्फी घेण्यासाठी किंवा एखादे फोटो घेण्यासाठी आता स्मार्टफोनचाच वापर होतो. पण फोटो काढताना तुम्ही कधी विचार केला आहे का की स्मार्टफोनला मागच्या बाजूला असणारा कॅमेरा डाव्या बाजूलाच का असतो? सुरूवातीला मोबाईलचा कॅमेरा मधोमध असायचा. हळूहळू सर्व कंपन्यांच्या मोबाईलचे कॅमेरे डाव्या बाजूला आले. आता प्रश्न हा आहे की कॅमेरा एका बाजूला सरकवण्याचं कारण काय? याची पहिली सुरुवात केली ती ॲपल कंपनीच्या आयफोनने.

हळूहळू सर्वच कंपन्यांनी हा पॅटर्न अंमलात आणला. कॅमेरा डाव्या बाजूला आणणं ही डिझाईन नाही. तर त्यामागे वेगळच कारण आहे. जगातील बहुतांश लोकं मोबाईलचा वापर हा उजव्या हाताने करतात. अशात मोबाईलच्या मागे डाव्या बाजूला असलेल्या कॅमेराने फोटो काढणं किंवा व्हिडिओ शुटिंग करणं अधिक सोपं जातं. याशिवाय आपण लॅंडस्केप मोडमध्ये फोटो काढतो तेव्हा ही कॅमेरा फिरवणं अधिक सोपं ठरतं. फोटो किंवा व्हिडिओ शुटिंग करणं सहज आणि सोप व्हावं हे मागचं प्रमुख कारण आहे.

ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) पूर्वीचा ब्रह्मदेश म्हणजे आजचा म्यानमार भारतापासून कोणत्या वर्षी वेगळा झाला?
२) कोणत्या राज्यापासून वेगळं झाल्यानंतर नागालँडची निर्मिती झाली?
३) अकबराची कबर कुठे आहे?
४) जम्मू आणि काश्मिर राज्याची अधिकृत भाषा कोणती?
५) ब्रिटिशांच्या काळातले एकमेव भारतीय गव्हर्नर जनरल कोण होते?
६) रवींद्रनाथ टागोर यांचा मृत्यू कोणत्या वर्षी झाला?
७) १९८३ मध्ये झालेल्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सामनावीराचा किताब पटकावणारा खेळाडू कोण?
८) भूमध्य समुद्रातलं सर्वात मोठं बेट कोणतं?
९) इंग्लिश खाडीची लांबी केवढी आहे?
१०) ऑस्ट्रेलियाचा शोध कोणी लावला?

उत्तर : १) १९३७ २) आसाम ३) सिंकद्रा ४) ऊर्दू ५) सी. राजगोपालचारी ६) १९४१ ७) मोहिंदर अमरनाथ ८) सिसिली ९) ५६४ किलोमीटर १०) जेम्स कूक

एसीवालं हेल्मेट

गंमत ग्यान

सुरक्षेसाठी हेल्मेट घालावं लागतं. पण उन्हाळ्यात हेल्मेट घातलं की खूप घाम येतो. कसं तरी होतं. घामामुळे केस अगदी भिजून जातात. अशा वेळी हेल्मेटमध्ये एअर कंडिशन बसवलं तर किती छान असं वाटून जातं. आता असं हेल्मेट तयार करण्यात आलं आहे. अमेरिकेतली हेल्मेट बनवणारी कंपनी फेहेर हेल्मेटने हे अनोखं हेल्मेट तयार केलं आहे. फेहेर एसीएच-वन असं या हेल्मेटचं नाव आहे. हे जगातलं पहिलंच एअर कंडिशन्ड हेल्मेट असल्याचा कंपनीचा दावा आहे. या हेल्मेटमुळे तुमचं डोकं आणि चेहरा थंड राहिल. बाहेर कितीही उकाडा असला तरी तुम्हाला मस्त गारेगार वाटेल.



फेरारी, रोल्स-रॉयससारख्या गाड्यांमध्ये बसवलं जाणारं एअर कंडिशनचं उपकरण या हेल्मेटमध्ये बसवण्यात आलं आहे. हेल्मेटच्या मागच्या बाजूला एसी बसवण्यात आला आहे. हेल्मेटच्या मागच्या बाजूला थर्मोइलेक्ट्रिक पंप बसवण्यात आला आहे. यामुळे आतली हवा थंड होते तसंच हेल्मेटच्या आतला ओलावाही कमी व्हायला मदत होते. या एसी हेल्मेटमध्ये बॅटरी बसवण्यात आलेली नाही तर त्यात पॉवर कोड आहे जो बाईकच्या आत बसवलेल्या १२ व्हॉल्टच्या बॅटरीला जोडला जाईल आणि तिथूनच ऊर्जा मिळवेल. भारतात खूप उन्हाळा असतो. त्यामुळे हे हेल्मेट अनेकांना उपयोगी पडू शकेल.

दोस्त हे मस्त

जाएंट कॅटिडिड

कॅटिडिड्सच्या जवळपास ६४०० प्रजाती आहेत. हे एक प्रकारचे कीटक आहेत. क्रिकेट नावाच्या किटकाशी त्यांचा जवळचा संबंध आहे. पण मोठ्या पायांचा कॅटिडिड ही सर्वात मोठी प्रजाती आहे. हे किटक मलेशियातल्या घनदाट जंगलात आढळतात. हे किटक ६ इंचांपर्यंत वाढू शकतात. त्यांचे पंख पानांसारखे असतात. पण लांब पायांचा त्यांना फारसा उपयोग नसतो. हे कीटक फारसे उडत नाहीत तसंच नीट उडीही मारत नाहीत.

खादाडी

ब्रोकोली चीज ब्रेड

अलिकडे अनेझक्क ठिकाणी खाद्यपदार्थांमध्ये ब्रोकोलीचा वापर केला जातो. ब्रोकोलीमध्ये खूप पोषक द्रव्यं असतात. तुम्ही ब्रोकोली चीज ब्रेड बनवून खाऊ शकता. यासाठी ब्रेड भाजून घ्या. ब्रोकोली आणि चीज यांचं मिश्रण तयार करा. त्यात थोडं मीठ घाला. ब्रेड भाजताना त्यावर चीज आणि ब्रोकोलीचं मिश्रण घाला. चीज वितळू द्या. आता हा ब्रेड सॉससोबत खा.

लाईफस्टाईल

खेळण्यांनी खेळलंच पाहिजे!

छोट्यांनो, खेळणी फक्त खेळण्यापुरती मर्यादित नसतात. खेळण्यांमुळे तुमचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास होत असतो. प्रत्येक खेळण्यात काही तरी संदेश दडलेला असतो. मित्र-मैत्रिणींसोबत खेळल्याने तुमच्यात एकीची भावना वाढीला लागते. त्यामुळे तुम्हीही तुमच्या वयाप्रमाणे खेळण्यांची निवड करा आणि भरपूर खेळा.

योगा टाईम

शक्ती मुद्रा

शक्ती मुद्रेने शरीरातल्या नाड्यांचं कार्य योग्य प्रकारे चालतं. शरीराची आणि मनाची शक्ती वाढते. ही मुद्रा वज्रासनात बसून करायला हवी. या मुद्रेचे अनेक लाभ आहेत. यामुळे तुमचा उत्साह वाढतो, ताण कमी होतो. पाठदुखीवरही ही मुद्रा उपयुक्त ठरू शकते.



कलासक्त

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पुणे

नवीन नाव नवीन उपक्रम

शरद कोरडे

> १८ मे १९७७ पासून हा दिवस जागतिक संग्रहालय दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक संग्रहालयाची संकल्पना, संग्रहित केलेल्या ठेव्यांची माहिती नागरिकांना मिळाली आणि इतिहासातील घडामोडींची व ऐतिहासिक संशोधनांची त्यांना जाणीव व्हावी या उद्देशाने इंटरनॅशनल काऊन्सलिंग ऑफ म्युझियम या संस्थेने १८ मे हा दिन प्रथम जागतिक संग्रहालय दिन म्हणून साजरा केला. त्यानंतर जगभर हा दिन साजरा होऊ लागला.

पुण्यातील दिपक वेलणकर यांना विटेंज कार बाळगण्याचा छंद आहे. त्यांच्याकडे अनेक विटेंज कार्स व दुचाकी वाहने आहेत. त्यांच्याकडे १९४२ पासून १९६२ पर्यंतच्या विविध कंपन्यांच्या गाड्या आहेत व त्या त्यांनी जपून ठेवून त्यांची नियमित दुरूस्ती व डागडुजी करून त्या नवीन कार्सप्रमाणे सुस्थितीत ठेवल्या आहेत. त्यात १९३९ सालातील ‘फियाट लिला’ १९४७ सालची ‘हिंदुस्थान १०’, ‘१९४९ सालची ‘स्कोडा’, १९५४ सालची लॅंडमास्टर, १९६१ सालची ‘मर्सडीज-१९० डी’ १९६२ सालची ‘स्टॅंडर्ड ओपन’, अशा एकूण १२ कार्स आहेत व तेवढ्याच विविध कंपन्यांच्या मोटार सायकली आहेत. यातील अनेक गाड्यांचा वापर अनेक चित्रपटात करण्यात आला आहे. मुंबई व गोवा येथे होणाऱ्या विंटेज कार रॅलीमध्येही दिपक वेलणकर भाग घेतात. १८ मे ला त्यांनी आपल्या गॅरेजमध्येही जागतिक संग्रहालय दिन साजरा केला.

वेलणकर यांच्या उपक्रमानंतर मला आठवण झाली ती पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाची, जे संपूर्ण आशिया खंडातील सर्वात मोठे संग्रहालय असून पुण्यातील लॉ कॉलेज रोडवर ते फिल्म डिव्हीजनच्या (पूर्वीच्या प्रभात स्टुडिओ) पुढील भागात दिमाखाने उभे आहे. भारत सरकारने १९६४ साली या संस्थेची स्थापना केली व या संस्थेचा प्रभम डायरेक्टर होण्याचा मान पी.के. नायर या चित्रपटासाठी समर्पित असलेल्या सच्च्या माणसाला मिळाला. त्यांनी अनेक चित्रपट संपूर्ण भारतातून व परदेशातून भ्रमंती करून अथक प्रयत्नांनी मिळविले व त्या फिल्म्सवर रासायनिक प्रक्रिया करून त्या संग्रहालयात ठेवल्या. दादासाहेब फाळके यांचे ‘राजा हरिश्‍चंद्र’ व ‘कालिया मर्दन’ या चित्रपटांच्या खराब झालेल्या फिल्म मिळवून त्यांनी त्यावर प्रक्रिया करून त्या सुस्थितीत आणून संग्रहालयात ठेवल्या. तीन दशके नायर यांनी संग्रहालयासाठी कठोर मेहनत करून त्याला उर्जितावस्था आणून दिली. सन २०१२ मध्ये शिवेंद्र सिंग यांनी पी.के. नय्यर यांच्या कार्यावर एक डॉक्युमेंट्री तयार केली. २००८ मध्ये नायर यांना सत्यजीत रे मेमोरियल ॲवॉर्ड मिळाला. पी.के. नय्यर यांच्या प्रदीर्घ समर्पित कार्यामुळे आज आपण देशविदेशातील उत्तमोत्तम चित्रपटांचा आस्वाद घेऊ शकतो.

ज्यांच्या अथक प्रयत्नांनी व समर्पणाच्या भूमिकेतून केलेल्या कार्यामुळे संग्रहालयाचा वृक्ष फोफावला व त्या पी.के. नय्यर यांचा जन्म ६ एप्रिल १९३३ मध्ये केरळमधील तिरूअनंतपुरम येथे झाला. बालवयापासून त्यांना चित्रपटाचे आकर्षण होते. १९४० मध्ये त्यांनी के. सुब्रमण्यम यांच्या ‘अनंत शयनम्’ व ‘भक्त प्रल्हाद’ या चित्रपटांच्या निर्मितीत काम केले. केरळ युनिव्हर्सिटीतून त्यांनी सायन्सची पदवी घेतली. १९५३ मध्ये चित्रपटसृष्टीत काम करण्यासाठी ते मुंबईला आले. मेहबूब खान, ऋषिकेश मुखर्जी व बिमल रॉय यांनी निर्मिती केलेल्या चित्रपटांसाठी त्यांनी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. त्याकाळचे फिल्म डिव्हीजनचे अधिकारी जीन भोनागरी यांनी त्यांना फिल्म डिव्हीजनमध्ये येण्याचे आमंत्रण दिले व नायर फिल्म डिव्हीजनमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून रूजू झाले. फिल्म्सचे संवर्धन व त्यावर प्रक्रिया करण्याचे काम जाणून घेण्यासाठी त्यांनी अमेरिका, रशिया, फ्रान्स, इटाली व इंग्लंडमधील संग्रहालयांशी संपर्क साधला. संग्रहालय व फिल्म डिव्हीजन या दोन वेगळ्या डिव्हीजन आहेत. त्या वेगळ्या झाल्याशिवाय फिल्म संवर्धनाचे काम स्वतंत्रपणे व समर्थपणे करता येणार नाही याची त्यांना खात्री झाली व नायर यांनी चित्रपट संग्रहालय ही स्वतंत्र शाखा करण्याची मागणी भारत सरकारकडे केली व त्याचा पाठपुरावा केला.

भारत सरकारने १९६४ साली स्वतंत्र चित्रपट संग्रहालयाची स्थापना केली व या संस्थेचे प्रथम डायरेक्टर होण्याचा मान पी.के. नायर यांना मिळाला. अनेक दुर्मिळ चित्रपट फिल्म त्यांनी भारतातून व परदेशातून मिळवून त्यांनी त्यावर प्रक्रिया करून ज्या जपून ठेवल्या. पुणे येथे मुख्यालय असलेल्या या संस्थेच्या बंगलोर, तिरूअनंतपुरम, कलकत्ता येथे शाखा आहेत. दोन वर्षापूर्वी मुंबई येथे नवीन शाखा करून सुसज्ज इमारतीमध्ये संग्रहालय करण्यात आले आहे. या संस्थेने चित्रपट प्रेमींना या संस्थेचे सभासद करून घेऊन त्यांचा सहभाग उपक्रमात करून घेऊन चित्रपट संस्कृतीचा प्रसार करणे, फिल्म लायब्ररीची देवाणघेवाण करणे, चित्रपट महोत्सव भरवून देशोदेशीचे चित्रपट पाहण्याची संधी प्रेक्षकांना मिळवून देणे, त्यावर चर्चा घडवून आणणे, फिल्म क्लब निर्माण करणे, चित्रपटाचा अभ्यास करण्यासाठी व संशोधन करण्यासाठी सुविधा पुरविणे, फिल्म अप्रिशियन कोर्स करणे, चित्रपट पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आदी सुविधा पी.के. नायर त्यांनी संस्थेमार्फत पुरविल्या व संस्थेला चांगला दर्जा मिळवून दिला. स्थानिक चित्रपट अभ्यासकांना व कलाकारांना, तंत्रज्ञांना एकत्रित सिनेमा पाहून त्यावर चर्चा करण्यासाठी साप्ताहिक, पंधरवडा व मासिक कार्यक्रम आखून देण्यात आला व सर्वांना एकत्रित केले.

आज चित्रपट संग्रहालयाकडे १०,६५५ भारतीय चित्रपट, १६२१४ परदेशी चित्रपट, २१४ त्यावर नियतकालिके, ६४,१७९ छायाचित्रे, १५,५२६ चित्रपटकथा, ३,६७६ चित्रपटपुस्तिका, १,८१९ चित्रपटांच्या संगीताच्या ध्वनीमुद्रिका, ५,३८० भित्तीचित्रे, २८,४५५ चित्रपटविषयक कात्रणे व व पुस्तके, ६,१५६ ध्वनीफिती व चित्रपटविषयक साहित्य, दोन अद्ययावत चित्रपटगृहे असून चित्रपट अभ्यासक वाढत्या प्रमाणात संग्रहालायचा फायदा घेत आहेत. संग्रहालयामार्फत निवडक संशोधकांना शिष्यवृत्त्याही देण्यात येत आहेत. दरवर्षी भारतीय चित्रपटांची फिल्मोग्राफी तयार करण्यात येते. भारत सरकार, राज्य सरकारे, दूरदर्शन यांच्याकडे गरजेप्रमाणे जुने, दुर्मिळ चित्रपट पाठविण्यात येतात, तसेच चित्रपट रथग्रहणाचे अभ्यासक्रमही घेण्यात येतात. आशिया खंडात सर्वात मोठे असे हे चित्रपट संग्रहालय असून त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता व महत्व प्राप्त झाले आहे.

कमाल अमरोही यांच्या महत्त्वाकांक्षी चित्रपट ‘पाकिझा’ हा १९७० साली प्रदर्शित झाला असला तरी त्याची निर्मिती १५ वर्षे चालू होती. या निर्मितीची दुर्मिळ चित्रफित आता या संग्रहालयात आहे. त्याचप्रमाणे ‘इन्ही लोगोंने’ या प्रसिद्ध गाण्याची ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रफितही या संग्रहालयात असून त्यावेळच्या नेपथ्याचेही आगळे दर्शन प्रेक्षकांना होणार आहे, कारण हे चित्रीकरण १९५६ सालात झालेले आहे. तसेच या चित्रपटात महमंद रफी यांच्या आवाजातील ‘जाये तो जाये कहाँ? चित्रपटात समाविष्ट न झालेली कव्वालीही संग्रहात असल्याचे संग्रहालयाचे आताचे संचालक प्रकाश मगदूम हे सांगतात. देशातील चित्रपटांचे जतन, संवर्धन आणि डिजीलायझेशन करण्यासाठी केंद्र सरकारने नॅशनल फिल्म हेरिटेज मिशन ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली असून त्यासाठी ५९७ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयावर सोपविण्यात आली असून त्यातून एक हजार चित्रपटांचे डिजीटलायझेशन करण्याचे उद्दिष्ट आहे.

गेल्या वर्षीच केंद्र शासनाने राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयच्या स्वत्रंतपणे चालणारा कारभार संपवून ‘नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कार्पोरेशन’ या नवीन महामंडळात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, फिल्म डिलीजन, डायरेक्टरेट ऑफ फिल्म फेस्टीव्हल, चिल्ड्रेन्स फिल्म सोसायटी ऑफ इंडिया या चार वेगवेगळ्या संस्थाचे विलीनीकरण करण्यात आले आहे. तत्कालीन माहिती व जनसंपर्क मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या संमतीने हा निर्णय झाला असल्याने पुण्यातून या प्रक्रियेत विरोधही झाला होता. नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कार्पोरेशन ही कंपनी जुन्या संस्थांतील कार्यकर्त्यांप्रमाणे समर्पणाच्या भावनेने व आत्मयितेने काम करणार आहे की, नाही हे पुढील काळात आपणास दिसेल. तो पर्यंत त्यांच्या भविष्यातील प्रकल्पास आपण शुभेच्छा देऊया! ●●

मा. भगवानदादा...

बॉलिवूड नृत्यकलेचा जनक



श्रीराम शेटये

मालवण तालुक्यातील पोईप या गावात जन्मलेल्या शेतकऱ्याच्या घरातील एका सामान्य व्यक्तीची चंदेरी दुनियेतील उंच भरारी थक्क करणारी आहे. कोकण म्हटलं की कलागुण म्हणजे जन्मजात ईश्‍वरी देणगीच असते.

‘‘भोली सुरत दिल के खोटे, नाम बडे और दर्शन खोटे’ या गाण्यावर ठेका धरायला लावणाऱ्या ‘मास्टर भगवान’ यांचा जन्म १ ऑगस्ट १९१३ रोजी एका गिरणी कामगाराच्या पोटी झाला. त्यांचे पूर्ण नाव भगवान आबाजी पालव, असे होते.

अनिल कपूर याच्या ‘तेजाब’ चित्रपटातील नृत्य हे मास्टर भगवान दादा यांची हुबेहूब नक्कल होती. मा.भगवान दादांचा प्रचंड आत्मविश्‍वास होता. अभिनयकला कुठे शिकले नाहीत. मुंबईत मिलमध्ये काम करताना अधुनमधून फावल्या वेळेत चित्रपट पाहायचे. त्यांना चित्रपट पहायचे वेड होते. त्यातूनच ते अभिनय कला आत्मसात करु लागले. चौथीपर्यंत कसेबसे शिकून शाळा सोडली व वडिलांप्रमाणे कापड गिरणीत मजूर म्हणून जाऊ लागले. सिनेमाची आवड होतीच आणि चंदेरी दुनियेचे आकर्षण यामुळे जेथे चित्रीकरण चालू असे तेथे ते जात असत. हळूहळू सेटवर पडेल ती कामे करू लागले. तेथेच अधेमधे साईड रोल मिळू लागला. स्टुडिओचे व्यवस्थापन करता करता ते सहाय्यक दिग्दर्शक बनले. पूर्वीच्या काळी चित्रपटांमध्ये पुरुष नृत्य करताना दिसत नसत. त्याकाळी मा. भगवान दादांनी आपली आगळी वेगळी नृत्यशैली चित्रपटांमध्ये आणली प्रेक्षकांना भगवान दादांच्या नृत्याने जणू मोहिनीच घातली. ‘रमय्या वस्तावय्या’ सारखी गाणी प्रेक्षक वारंवार पाहण्यासाठी चित्रपटाचे तिकीट खरेदी करत असत. ‘बेवफा आशिक’ या १९३१ चित्रपटात भगवानदादांना सर्वप्रथम मोठी भूमिका मिळाली, तिही विनोदी भूमिका. त्यानंतर त्यांनी ‘दैवी खजाना’, ‘जलता जिगर’, ‘प्यारी’, ‘कट्यार’ यासारखे चित्रपट केले. १९३५ सालचा ‘हिम्मते मर्दा’ हा भगवानदादांचा पहिला बोलपट. त्यात त्यांनी बाजी मारली. अभिनयाबरोबरच चित्रपटाचे दिग्दर्शनही त्यांनी केले.१९५७ सालच्या राजा ठाकूर यांच्या ‘उतावळा नारद’ या मराठी चित्रपटातून त्यांनी सर्वप्रथम मराठी चित्रपटात काम केले. त्यानंतर अनेक मराठी-हिंदी चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या. दादा कोंडके यांच्या ‘रामराम गंगाराम’ या मराठी चित्रपटातील ‘गंगू तारूण्य तुझं बेफाम’ हे गाणं प्रेक्षकांनी अक्षरशः उचलून धरले होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोईप या गावचा एवढा मोठा बॉलिवूडचा स्टार होता हे काहीजणांना ठाऊक नव्हते. भगवानदादा यांची बॉलिवूडमध्ये खास अशी जीवनशैली होती. राजकपूर, राजेंद्र कुमार, शम्मी कपूर यांचा काळ सुवर्णकाळ होता पण त्या काळात मा.भगवान दादांनी वेगळी नृत्यशैली चित्रपटांमध्ये आणली आणि अनेक अभिनेत्यांना मग संगीताच्या तालावर थिरकणे भाग पडले. सहाय्यक अभिनेता, विनोदी अभिनेता म्हणून सुरू केलेली कारकीर्द पुढे मा.भगवान दादा यांनी नायक म्हणूनही चित्रपट गाजवले. ●●

अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर क्राईम आणि कॉमेडी चित्रपटांचा धमाका!

राम कोंडीलकर

आपल्या रसिक प्रेक्षकांसाठी अल्ट्रा झकास मे महिन्यात दोन जबरदस्त चित्रपट घेऊन येत आहे. क्राईम आणि रहस्याने भरलेला साऊथचा डब चित्रपट ‘अभ्युहम’ म्हणजेच ‘संभ्रम’ २४ मे २०२४ आणि हसून हसून पोट दुखेल असा हॉलीवूड डब कॉमेडी चित्रपट ‘टायगर रोबर्स’ म्हणजेच ‘चोरीचा मामला’ ३१ मे २०२४ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे.

संभ्रम चित्रपटात आपले वडील निर्दोष आहेत हे कळाल्यावर जयंत त्यांना तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी पुराव्यांचा शोध घेऊ लागतो तर दुसरीकडे चोरीचा मामला चित्रपटात एका वाघिणीचे अपहरण होते तेव्हा तिचा आईसारखा सांभाळ करणारी एक स्त्री एका एजन्सीची मदत घेते. जयंतचे वडील तुरुंगातून सुटतील की नाही आणि वाघीण सापडते की नाही हे त्या त्या चित्रपटात रंजकपणे कळणार आहे.

‘‘भाषेचे सर्व अडथळे तोडून दोन वेगळ्या संस्कृतींचे चित्रपट मराठी भाषेत प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून देताना अत्यंत आनंद होत आहे. रसिक प्रेक्षकांना दोन्ही चित्रपट नक्कीच आवडतील अशी आशा आहे.’’ असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.





कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्‍वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)